# चैतन्य लहरी

अंक क्र. : ९, १०

सप्टेंबर/ऑक्टोबर २००१



सतत अलिप्तपणे स्वतःला स्वच्छ करत रहा आणि शुद्धता व प्रेमाने
परिपूर्ण सहजयोगी बनण्याचा उत्तरोत्तर प्रयत्न करा.

प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी
गुरू पूजा, कबेला, ८ जुलै, २००१






## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींनी अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांना अलिकडेच पाठविलेल्या पत्राचा अनुवाद

प्रिय अध्यक्ष महाशय,

मला आपल्याला या आधीच पत्र पाठवायची इच्छा होती; पण सध्याच्या तणावग्रस्त परिस्थितीमध्ये आपण आपल्या देशावर आलेल्या संकटामुळे खूप व्यग्र असाल असे वाटत होते. मी टेलिव्हिजनवर दाखवण्यात येत असलेल्या सर्व घटनांकडे व आपल्याकडेही खूप लक्षपूर्वक पहात आहेच. मी आधींच्या पत्रांत सध्या जगभर चालू असलेल्या अतिरेक्यांच्या भयानक दुष्कृत्यांचा समूळ नायनाट करुन जगातील समस्त मानवजातीला या राक्षसी प्रवृत्तींपासून वाचवण्याचे महान कार्य आपल्याच हातून घडणार आहे याची कल्पना दिली आहेच.

आजकाल करुणा व क्षमा हे शब्द अनेक लोक सर्रास वापरत असतात. एखाद्या पापी माणसाने क्षमा मागितली तर समजूं शकते पण राक्षसी वृत्तीचा माणूस क्षमेला कधीच पात्र नसतो. भगवत्गीतेमध्ये हेच उत्तर सापडते. अर्जुन स्वतःच्याच आप्त व गुरु अशा शत्रूंबरोबर युद्ध करण्याच्या प्रसंगामध्ये भांबावून गेला व करुणा आणि विषादयुक्त संभ्रमात पडून, शस्त्र खाली ठेऊन युद्धापासून परावृत्त झाला; त्याने श्रीकृष्णाला विचारले की, "अशा वेळी अध्यात्मिक जाण असलेला पुरुष स्थितप्रज्ञ कसा असतो?" तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, "साक्षीस्वरूप प्राप्त झालेल्या पुरुषाच्या मनात कधीच विकल्प येत नाहीत आणि त्याचे मन स्पष्ट असते. म्हणून अधर्मी लोकांना ठार करण्याची प्रबल इच्छा व शक्ति त्याला प्राप्त होते." ख्रिस्तांनी सुद्धा मंदिरात बसून धंदे करणाऱ्या लोकांना हंटरने फोडून काढायला मागे-पुढे पाहिले नाही. म्हणजे श्रीकृष्णांनीही अर्जुनाला सत्याचा सांभाळ करण्यासाठी व सैतानी प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी युद्ध करणे हे कर्तव्यच असल्याचे बजावून सांगितले. आज सैतानी वृत्तींनी चालवलेल्या भेकड कारवायांमुळे जगभर होत असलेल्या हाहाःकाराच्या परिस्थितीत गीतेचा हाच संदेश दुमदुमत आहे.

सध्याच्या कलियुगामध्ये अधर्मापासून जगाचे कल्याण करण्याची मोठी जबाबदारी आपल्या खांद्यावरच आहे. सांप्रत व पूर्वकालीन सर्व साधुपुरुषांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत. आपल्या देशात घडलेल्या पाशवी संहारक दुष्कृत्यांच्या मागे असलेल्या भेकड राक्षसांचा नाश करण्याचे धैर्य व शक्ति त्यांतूनच आपल्याला मिळणार आहे.

जगभरातील सर्व सहजयोगी आपल्याला, या ऐतिहासिक व उदात्त कार्यामध्ये सुयश मिळो, अशी सदिच्छा पाठवीत आहेत.

आपल्याला व संपूर्ण अमेरिकन नागरिकांना परमेश्वराचे अनंत आशीर्वाद. आपल्या नेतृत्वाखाली सत्याचा विजय असो.

आपली

श्रीमाताजी निर्मलादेवी


- निर्विघ्नं कुरु मे देव ........ २
- ईस्टर पूजा ........ ३
  इस्तंबूल : टर्की : २२ एप्रिल २००१
- सहस्त्रार पूजा ........ ६
  कबेला : ६ मे २००१
- गुरुपुजा ........ ८
  कबेला : ८ जुलै २००१
- श्रीकृष्ण पूजा ........ १२
  कन्हानो हरी : २९ जुलै २००१
- विवाह सोहळा २००१ ........ १६
  कान्हाजोहरी : ३० जुलै २००१
- महाराष्ट्र सेमिनार २००१ ........ १७
  इचलकरंजी
- अमृतवाणी ........ १९
- सहज-समाचार ........ २०

# निर्विघ्नं कुरू मे देव....

दरवर्षीप्रमाणे यंदाचा गणेशोत्सव सर्वत्र व विशेषतः पुण्यामध्ये आरास व रोषणाईसह उत्साह, आनंदपूर्ण वातावरणात नुकताच पार पडला. प. पू. श्रीमाताजींनी सृष्टीमधील श्रीगणेशांची स्थापना शुभ व कल्याणकारक वातावरणनिर्मितीसाठी सर्वप्रथम केली गेल्याचे अनेक वेळा सांगितले आहे. श्रीगणेशोत्सव आजकाल होतो तसा साजरा करण्यामागे जनजीवनात मांगल्य, पावित्र्य व सूज्ञता वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने कितपत विचार होत असावा असे मनात आल्याशिवाय राहात नाही. त्याचप्रमाणे श्रीगणेशांची अवहेलना केल्याने काय परिणाम होतात हेही श्रीमाताजींनी बजावून ठेवले आहेच. पण प्रसिद्धी, स्पर्धा, चढाओढ, भव्यता, आक्रमकता इत्यादी गोष्टींचेच प्रतिबिंब जनमानसावर अधिक प्रभावीपणे होत असावे असे वाटते.

काळाचा महिमाच असा असावा की, विकास, आधुनिकता, सांपत्तिक भरभराट, तंत्रज्ञान इत्यादी भौतिक क्षेत्रातील वेगवान प्रवास कौतुकास्पद असला तरी समाज-पुरुषाची व समाजमनाची वाटचाल कुठल्या दिशेने चालली आहे, असा संभ्रम चिंतनशील मनात उमटल्याशिवाय रहात नाही. सुशिक्षित व सुसंस्कृत, माहिती-तंत्रज्ञान, विकास व मूल्याधिष्ठित जीवन, सुर व असुर प्रवृत्ति, सुबत्ता व अभिरुची-संपन्नता, अंधश्रद्धा व श्रद्धायुक्त बुद्धि इत्यादीबद्दलच्या विवेकयुक्त व्यवहारात आपण कुठे आहोत हे भान लोकांमध्ये जागृत राहणे आजकालच्या परिस्थितीमध्ये म्हणूनच जास्त आवश्यक आहे.

हे आंतरिक परिवर्तन माणसांमध्ये घडवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठीच श्रीमाताजींनी सहजयोग सुरु केला व आपण सर्व सहजयोगी त्यांच्या या अवतरणकार्याचे माध्यम असल्यामुळे आपल्याला परमचैतन्याची शक्ति दिली. समस्त मानवजातीमध्ये हे परिवर्तन घडवून आणण्यासाठीच आपल्याला त्यांचे सतत ऋणी राहून अधिकाधिक कार्यरत व्हायचे आहे. हा बदल सर्वत्र घडून येण्यास वेळ लागेल व प्रसंगी आपल्याला विरोध व उपेक्षेलाही सामोरे जावे लागेल; पण त्यावेळीही लोकांमधील अज्ञानाची करुणा बाळगून संयम आणि आत्मविश्वासाने कार्य करीत राहणे भाग आहे. त्याचबरोबर स्वतःला सहजयोगात परिपक्व बनत जाऊन अग्रेसर व्हायचे आहे. निष्क्रियपणाचा पूर्ण त्याग करायचा आहे.

तेव्हा अज्ञान, आळस, संकोच, भीति, उथळपणा, आत्मविश्वासाचा अभाव इत्यादी सर्वांना निपटून सहजयोगाच्या प्रचार व प्रसारकार्याला 'रान उठवले पाहिजे' अशा उभारीने आपण सर्वजण कार्याला लागू या आणि या कार्यामध्ये आपल्या आड येणारी आपल्यामधील व वातावरणातील सर्व विघ्ने दूर करण्यासाठी श्रीगणेशांना ''निर्विघ्नं कुरू मे देवं'' अशी हृदयापासून प्रार्थना करू या.

# ईस्टर पूजा

प. पू. श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण
इस्तंबूल : टर्की :
दि. २२-एप्रिल २००१

**अहंकाराच्या भोवऱ्यांत बुडलेल्या लोकांना सहजयोग देऊन त्यांना वाचवणे तुमचे कर्तव्य आहे.**

आज आपण ईस्टर पूजा करण्यासाठी जमलो आहोत. अध्यात्मिकदृष्ट्या इतिहासातील हा एक विशेष दिवस आहे. खिस्तांनी आजच्या दिवशी, मृत्यूवर विजय मिळवून आपले पुनरुत्थान घडवून आणले. सहजयोगातही तुम्ही जडत्वांवर विजय मिळवून चैतन्याकडे जाता. या उत्थानाची स्वतःकरिता व जगासाठी जरुर होती म्हणून लोकांना वाचविण्यासाठी स्वर्गातून ते खाली पृथ्वीवर अवतरले. जीझस हे आदर्श संत, आदर्श आत्मसाक्षात्कारी असे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच त्यांनी हे सर्व घडवून आणले; पण पुनरुत्थान हे आपल्या व्यक्तिमत्त्वाचे अंग प्रत्यंगच आहे याचे ते स्वतः एक प्रतीकच होते. लोकांचा आपल्या मनावर ताबा नव्हता; आपल्या जाणिवेप्रमाणे ते वाटेल तसे भरकटत राहिले, कुठल्याही प्रकारचे संतुलन नव्हते, कुठलाही विवेक नव्हता. यासाठीच त्यांचे गणेशरूपात अवतरण झाले. त्या काळी लोकांना अध्यात्माचे बिलकुल ज्ञान नव्हते. अशा परिस्थितीत त्यांचे कार्य फार कठीण होते; पण आपल्या पुनरुत्थानातून त्यांनी ते घडवून आले.

जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा तुमचेही पुनरुत्थान घडते. कुंडलिनीमुळे तुमचा सर्वव्यापी चैतन्याशी योग घडतो. सर्वसाधारण लोकांपेक्षा तुमचे जीवन अधिक उंचावते. ही प्रेमशक्ति तुम्हाला शुद्ध आनंद देते. जसजसे तुम्ही त्यात उतरता तसतसे तुम्हाला पूर्ण सत्य काय हे समजते, जे आपल्यातच आहे. या सत्याच्या जाणिवेमध्ये तुमचे व्यक्तिमत्त्व एक विशेष बनते. तुम्ही असत्यापासून दूर राहाता, त्याचा त्याग करता. या भागात बरेच इस्लामिक आहेत. इस्लामिक लोक फार कट्टर आहेत. त्यांना चुकीच्या गोष्टी सांगून चुकांचे मार्गदर्शन केले गेले. विशेषतः भारतात तर त्यांची स्थिति फार कठीण आहे. ते इस्लाम शिकवणीच्या बिलकुल जवळ वाटत नाही. महंमदसाहेबांच्या नावाखाली सर्वकाही चालू आहे. सर्व जगात ते आहे; पण एकीकडे महंमदसाहेब दुसरीकडे जीझस. दोघेही समान आहेत. त्यांच्यात काहीही अंतर नाही. ते कधीही एकमेकांबरोबर लढले नसते; पण त्यांचे शिष्य झगडत बसतात. हे फार चुकीचे वाटते.

खिस्तांनी कधीही लग्नाचा विचार केला नाही; त्यांची त्यांना जरुरी नव्हती. अगदी तरुणपणी त्यांना सूळावर चढविले गेले. स्वतःकरिता त्यांना ते जरुर नव्हते. पण लोकांचे आज्ञाचक्र उघडावे, जो मार्ग अती सूक्ष्म आहे, यासाठी ते सूळावर चढले. आज्ञाचक्र पार होण्यासाठी त्यांनी हे सर्व काही स्विकारले. तुम्हाला सहस्राराकडे जाण्यासाठी आज्ञाचक्र पार केलेच पाहिजे. त्यासाठी तुम्हाला गोंधळून जाण्याची जरुरी नाही. किंवा सूळावर चढायला नको. फक्त तुमचा अहंकार सूळावर चढवा. त्यासाठी उत्थानाची जरुरी आहे. त्याशिवाय आपण केलेल्या चुकांची जाणीव तुम्हाला होणार नाही. लोक कशा चुकीच्या कृत्याकडे वळतात हे पाहिले की, आश्चर्य वाटते. एकमेकाला मारण्यापर्यंत मजल इतका मूर्खपणा ते करतात आणि आपण नेमके काय करतो हे त्यांना समजू शकत नाही. मृत्यूनंतर किंवा त्याआधीच त्यांचे काय होईल हेहि समजत नाही. जगातील अशा अनेक देशांत लोक मूर्खपणाने भांडतात. ते आणखी रसातळाला जातात. एवढे होऊनसुद्धा आपण का त्रासात आहोत, आपला सर्वनाश जवळ का आला याकडे ते सर्व उमजूनसुद्धा डोळेझाक करतात. यासाठी त्यांनी आपले उत्थान केले पाहिजे. भौतिकतेपलीकडेही काही विशेष आहे हे जर जाणले तर त्यांना त्यांच्या चुका लक्षात येतील. त्यांना खरे तर ठगच म्हटले पाहिजे. एकमेकांना फसवणारे, समाजाला फसवणारे. मला तर वाटते सर्व अर्थशास्त्राचा एकूण पाया फसवणूकच आहे. त्यातून लोकांत आपण असुरक्षितता वाढवतो हे ते विसरतात. पैसा पैसा करून लोक अधिक हावरट होतात. त्यामुळे पैशाचे महत्त्व आणखीच वाढते. खिस्तांना पैशाचे बिलकुल महत्त्व वाटत नसे. ते एक गरीब साधेसुधे, एका सुताराचे पुत्र होते; पण आत्मतत्त्व हेच त्यांचे धन होते. या भौतिक

जीवनापलीकडे एक विशेष जीवन आहे, त्यासाठी तुमचा आत्मा जागृत झाला पाहिजे, नाहीतर तुमचे जीवन व्यर्थ आहे असे ते लोकांना सांगत. धर्माबद्दल ते पाद्र्यांशी ज्या हुशारीने बोलत त्यावरून ते निश्चितच विद्वान होते. या लहान वयात त्यांना धर्माबद्दल सखोल ज्ञान होते. ते ईश्वरी व्यक्तीमत्त्व ईश्वराने निर्मिलेले होते. ते श्रीगणेश होते, ॐ होते, ते 'ज्ञान' होते, सर्वकाही; पण तरीसुद्धा लोकांनी त्यांना ओळखले नाही. कारण लोक सत्य जाणत नव्हते. खोटेपणाचा प्रभाव जास्त होता आणि शेवटी त्यांना सूळावर चढवले म्हणजे सज्जनांना सूळावर आणि दुर्जनांना डोक्यावर घेतात. आताचा काळ तर कठीण आहे. लोक चुकीच्या गोष्टी करतात. लोकांना ठकवतात व आपणही ठकले जातात.

**पण आता सगळे उघड पडणार आहे. या वर्षात ते घडणार आहे. त्यांचा हावरटपणा, त्यांची आक्रमकता सर्वांना मूठमाती मिळेल. या वर्षी हे सर्वकाही घडणार आहे. त्यासाठी आता तुमचे उत्थान घडवून आणा.** पैसा आणि सत्ता तुम्हाला मान-सन्मान देणार नाही. उच्च प्रतीचे असे काही प्राप्त करा. खिस्तासारखे जे झाले त्यांच्या नावाचा महिमा राहातो. कारण त्यांनी जीवनात लोकांसाठी मोठा त्याग केलेला आहे. जेव्हा असे लोकांवर प्रेम असते तेव्हा ते मानवजातीच्या उद्धाराचाच नेहमी विचार करत असतात. स्वतःपुरता विचार न करता सर्व जगाचा विचार करा. सर्व विश्वासाठी आपले जीवन व्यतीत करा. सर्वांना प्रेमाने आपले समजणे यातूनच मोठा आनंद मिळतो. पैसा, मालमत्ता असली तरी प्रेमाशिवाय तुम्हाला आनंद मिळणार नाही. खिस्तांनी याचीच शिकवण दिली. सर्व काही प्रेमाने जिंकता येते. खिस्तांना सर्व मानवजातीसाठी प्रेम वाटत होते आणि लोकांना त्यांच्या उत्थानासाठी ते तयार करत होते. सहजयोग येण्याच्या आधी हे जर त्यांनी घडवून आणले नसते तर मला हे साध्य करणे कठीण झाले असते. मला लोकांची आज्ञा उघडणे शक्य झाले आणि कुंडलिनी वर येऊन सहस्रार उघडणे सोपे झाले. लोकांवरील शुद्ध प्रेमातून त्यांनी हे सर्व केले. याचे सहजयोगाला खूपच साहाय्य झाले. त्यांच्याशिवाय आज्ञाचक्र उघडणे शक्य झाले नसते. आज्ञा ही एक फार हानी पोहोचवू शकते. लोकांना काही चुकीच्या हानीकारक गोष्टी करण्यात बिलकुल कमीपणा वाटत नाही. त्यांचे हृदयच दगडासारखे असते; पण खिस्तांनी आज्ञा कशी उघडावयाची, पार करावयाची हे दाखवून दिले. आज्ञाचक्राला येथे ते तिसरा डोळा म्हणतात. तिसरा डोळा उघडणे म्हणजे तुमच्यात खिस्त जागृत होतात. म्हणजेच तुम्ही या सर्व नाटकाचे साक्षीदार होता, साक्षीत्व प्राप्त होते आणि तुम्ही ते पाहू लागता. तुम्ही आतून पूर्ण शांत होता. निर्विचारतेच्या जाणिवेत असता. प्रतिक्रिया न दाखवता सर्व निरीक्षण करत असता. यामुळेच खिस्तांचे अवतरण त्यांचे आज्ञावरील स्थान यावर तुम्ही विश्वास ठेवता त्यांचा जन्म, त्यांचे पुनरुत्थान हे सर्व काही व्यवस्थित घडविले गेले. एखाद्या यंत्राप्रमाणे आपले शरीर सर्व चक्रांनी युक्त आहे. शेवटचे अवघड असे आज्ञाचक्र केवळ श्री खिस्तामुळेच उघडले गेले. अगदी सुंदरपणे ज्यामुळे तुम्ही आपल्या अहंकाराला स्वच्छपणे निरखू शकता ती क्षमता तुम्हाला मिळाली. अहंकारातून जर तुम्ही काम करीत असाल तर तुम्ही लवकर थकाल. त्यात तुम्हाला स्वतःचा मोठेपणा वाटतो. खोटी अहंता तुम्हाला थकवा देते; पण स्वतःच्या जीवनातून खिस्तांनी सर्व काही सोपे केले.

काही खिश्चन देशसुद्धा खिस्ताच्या शिकवणुकीपासून दूर गेले दिसतात, ते एकत्र येऊन दुसऱ्यावर आक्रमण करतात. जणू काही ते महान देशाचे झाले. स्वतःला राजे म्हणतात. भारतातही ते आलेत. सर्व काही काबू केले आणि लोकांना गुलामगिरीत ओढले. त्यांच्यातील अहंकारामुळे ते अधिक भडकतात. सध्याच्या आधुनिक युगात हे सर्व निःसंकोच चालू आहे. प्रसिद्धी माध्यमातूनही याला पुरावा मिळतो आणि अधिकच गोंधळ होतो. कारण ते सत्य जाणू शकत नाही. एकमेकाला ठार करायला घाबरत नाही. त्यापेक्षा जनावरे बरी. लढा हा केंद्रबिंदु झाला आहे. पण खिस्ताकडे पाहा. ते कोणाशी झगडले नाही, वाद घातला नाही. स्वतःला सूळावर चढवून घेतले ते सर्व हसत स्विकारले आणि सर्व जगाच्या उद्धाराकरिता पुनरुत्थान घडवून आणले. तो आदर्श आपण ठेवला पाहिजे. जेव्हा तुमची आज्ञा स्वच्छ असते तेव्हा कुणावर वर्चस्व ठेवण्याची कल्पनासुद्धा होणार नाही, कुठलेही पूर्वग्रह राहणार नाही. तुम्ही शांति आणणारे दूत होता. जिथे असाल तिथे शांति प्रस्थापित करता. सहजयोग्यांनी हे विशेष जाणले पाहिजे की, जेव्हा तुम्ही आज्ञेच्या वर असता तेव्हा तुम्हाला दुसऱ्याकरिता कष्ट घेतले, शेजाऱ्याकरिता, देशाकरिता घेतले तरी त्रास वाटत नाही. तुम्ही त्या दैवी शक्तीचे उगमस्थान असता, मग तुम्ही काहीही घडवून आणू शकता. लोकांत परिवर्तन घडवू शकता. अशा तऱ्हेने वैयक्तिकपणे लोकांचे पुनरुत्थान झाले; पण ते जर सामूहिकतेमध्ये उतरले तर सर्व जगातील लोक बदलतील, आक्रमकता निघून जाईल. लोकांच्या घाणेरड्या कारवायांना आपोआप पायबंद बसेल. खिस्तांनी हे जे सर्व घडविले ते या पृथ्वीवर शांती नांदावी म्हणून केले. शांती आतून पाहिजे. ती जर नसेल तर बाहेरून ती कशी होईल? वरून शांतीच्या गप्पा मारणारे देश वेळ आली की, युद्धाला तयार होतात, हे कसे घडते, दुसरा कुठला उपाय सापडत नाही का? त्यांना सहजयोगात आणणे हाच एक उत्तम उपाय आहे. खिस्तांनी अहंकार विरण्यासाठी प्रयत्न केले. अहंकारामधील समस्या उपटून टाकल्या आणि त्यातून नम्र व शांत असे सज्जन निर्माण केलेत. जे कधीही जगाला बाधक

होणार नाहीत. अहंकारामुळे आज्ञेला कशी बाधा पोहोचते हे तुम्ही पाहू शकता. ती ठीक नसेल तर माणूस असंतुलित होतो. खिस्तांच्या वेळी हा अहंकार फार बाधक तर होता आणि लोक त्याविषयी जाणू शकत नव्हते आणि मग बोलू शकत नव्हते. त्यासाठी आज्ञाचक्र उघडण्यासाठी त्यांना स्वतःच्या जीवनाचा त्याग करावा लागला. सहजयोगात तुम्हाला साक्षीत्व प्राप्त होते. या स्थितीशिवाय तुमचा अहंकार कमी होणार नाही; नाही तर लोक अहंकारातून चुकीच्या गोष्टींचेही समर्थन करतात ते चांगल्यासाठी आहे, असे सांगतात, स्वतःसाठी व इतरांसाठीही. स्वतःलाच प्रमाणित करतात. एवढेच नाही तर आम्हीच ईश्वराचे पाईक आहोत, असे ठसवतात कुठल्या कायद्याने? असे अनेक पंथ निर्माण झालेले आहेत.

**जीवनात अध्यात्म असेल तर लोक अत्यंत नम्र होतात. दुसऱ्यांचे ते हित पाहतात.** त्यांचा कळवळा हीच त्यांची ताकद असते, त्यांचे भूषण असते. अहंकारातून कार्य करणाऱ्या लोकांना वाटते त्यांनी केलेले सर्व चांगले असते; पण काळच त्यांचे कार्य कसे चुकीचे आहे हे ठरवितो आणि त्यांचा मूर्खपणा उघडा पडतो. मग कुणीही त्यांचे नाव घेत नाही. हे सर्व परमेश्वरी कार्य आधीच ठरविलेले असते. अहंकाराच्या दुसऱ्या बाजूला आपला प्रतिअहंकार आहे (conditioning). उदाहरणार्थ, एकजण दुसऱ्याच्या घरी जातो, तिथला गालीचा पाहतो आणि हा एवढा खास नाही, असा शेरा मारतो तेव्हा आपण कुण दुसऱ्याला इजा पोहोचवतो याचे त्यांना भान नसते. अशा प्रकारची तुलनासुद्धा प्रतिअहंकाराचा परिणाम आहे. अशा पूर्वग्रहामुळे तुम्ही आनंदाला मुकता. तुम्ही कशाचीच मजा घेऊ शकत नाही. सर्व काही प्रतिअहंकारच ठरवतो, त्यात स्वतंत्रता नसते. 'मला हे आवडत नाही' असे कधीच म्हणू नका. सहजयोग्यांनी तर असे कधीच बोलू नये. मी कधीच असे बोलत नाही. तसेच कधीही टीका करू नका. ह्युद्धा प्रतिअहंकाराचा भाग आहे. युरोपमध्ये लोक म्हणतात, आमच्याकडे पूर्ण स्वच्छता असते; पण तेथेही जनावरांना एक भयंकर रोग झाला कसा, ते तर स्वतःला एकदम आम्ही जगात स्वच्छ मानतात हासुद्धा प्रतिअहंकाराचाच परिणाम आहे. श्रीमंत लोक किंवा अमेरिकेसारखे राष्ट्र स्वतःला नेहमीच श्रेष्ठ समजतात; पण तेथेसुद्धा प्रत्येकाला स्वतःची कीव येते; पण निसर्ग असा धडा शिकवतो अगदी त्याच्याविरुद्ध बाजूला नेऊन सोडतो. स्वतःचा गर्व वाढवणे किंवा तुम्ही दुसऱ्यावर काही तरी लादता, तर ते त्यांच्यावरच उलटते व त्यांनाच कमीपणा वाटतो. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर भूकंप होतात, निसर्गाचा कोप होतो. मिसीसीपी काठी 'रेड नेक्स' (Red necks) म्हणजे लाल गळ्याचे लोक आहेत ते तेथील काळ्या लोकांना त्रास देत. काहींना स्वतःच ठार करत आणि त्याचा आळ त्या लोकांवरच घेऊन काही लोकांना कैद करून छळत. हे थांबेना. शेवटी त्या मिसीसीपी नदीला एवढा पूर आला की, त्या गोऱ्या लोकांची सर्व मालमत्ता त्यात वाहून गेली व पळता भुई थोडी झाली. अशा तऱ्हेने मिसीसीपीने त्यांना धडा शिकवला. निसर्गालासुद्धा अशा अतिप्रतिअहंकाराचा तिटकारा येतो. हे बऱ्याच देशांचे दुखणे आहे. वर्णभेद हाहि त्याचाच परिणाम आहे. हाही प्रखर प्रतिअहंकाराचाच भाग. सर्व मानव हे त्या ईश्वराचीच लेकरे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. अमेरिकेतील सर्व काळे लोक बाहेर पडले तर त्यांच्या खेळांचे काय होईल? सर्व भारतीय डॉक्टर्स व नर्सेस बाहेर पडले तर काय वाताहात होईल? सर्व जग एक आहे व लोकांना एकमेकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे हे ते जाणतील व हळूहळू त्यांच्यात सुधारणा होईल. स्वतःला श्रेष्ठ समजणे हा एक भयंकर असा प्रतिअहंकराचा भाग आहे. एवढेच नाही तर अहंकार आणि प्रतिअहंकाराचे मिश्रण आहे; पण पुनरुत्थानानंतर सहजयोग्यांना आपल्या सरकारचे कुठे चुकते याचा ते विचार करू लागतात. ते सावध होतात. आपल्या देशाचे दोष काय, कोठे चुकते ते समजते खिस्तांनी आज्ञाचे महत्त्व पूर्णपणे जाणते व आज्ञाचक्र उघडल्याशिवाय त्यांना आत्मज्ञान होणार नाही. ते त्यापलीकडे (सहस्रारापर्यंत) जाऊ शकणार नाहीत. म्हणूनच ते मूळावर चढले व त्यांचे पुनरुत्थान झाले. हे सर्व इतक्या सुंदर रीतीने घडते की, त्यातून जगातील मूर्खतेचे उच्चाटणाचे मनोहारी दृश्य लोकांना पाहायला मिळाले. दुसऱ्यातील प्रेम, सौंदर्य, मोठेपणा याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. मानवाला गिळणारा हा सर्परूपी अहंकाराचा लोप हळूहळू झाला. प्रखर अहंकार व प्रतिअहंकार चांगले आणि वाईट काय हे पारखू शकत नाही. त्यामुळे त्यांना ईश्वराकडूनही योग्य ती शिक्षाच मिळते. **यासाठीच पुनरुत्थानाची आवश्यकता आहे. नाही तर लोक आंधळेच राहातात. मूर्खपणाच्या भोवऱ्यात सापडतात. अहंकाराच्या प्रवाहात वाहात जाऊन त्यात बुडून जातात. अशा लोकांना सहजयोगात आणून त्यांना आत्मसाक्षात्कार देऊन वाचवले पाहिजे.** याचाच अर्थ (know thyself) 'स्व'ला ओळखा. अशा लोकांतूनच सहजयोग बांधला जाईल, पसरला जाईल. पुरुत्थापनाच्या या किमयेतून अहंकार व अतीव प्रतिअहंकाराला नेस्तनाबूत करणारा हा नीरक्षीर-विवेक दिला याबद्दल खिस्तांचे आभार मानले पाहिजेत. सहजयोग्यांनीसुद्धा हे पूर्ण आदराने जाणून आपल्या अहंकार व प्रतिअहंकारावर विजय मिळविला हे पाहून मला आनंद होतो.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# सहस्त्रार पूजा

प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण

कबेला

दि. ६ मे २००१

**सहजयोग मिळाला एवढ्यावरच थांबू नका. आपल्याला सर्व जग वाचवायचे आहे.**

युगानुयुगे लोक साधना करत आहेत; पण सत्याचा शोध घेण्यासाठी ईश्वरी शक्तीला शरण गेल्याशिवाय तरणोपाय नाही हे जाणले पाहिजे. सर्व जगभर साधक झालेत. मी तुर्कस्तानला गेले तेथेही अनेक सुफी संत मला भेले; पण त्यांचे शिष्य पार झालेले नव्हते. सुफींना स्वतः कसा आत्मसाक्षात्कार झाला हे समजले नव्हते. एकंदरीत सर्वत्र याबाबत अंधार होता. ते कसे साध्य करावयाचे याबाबतीत सर्वत्र अज्ञान होते. सर्व धर्मात हिंदु, ख्रिश्चन, मुस्लिम लोक जास्त कर्मकांड करत असत. दिवसभर हे त्यांच्या कर्मठतेत व्यग्र असत. त्यातून त्यांना ईश्वरप्राप्ती घडेल असे वाटत होते. ते सर्व चुकीच्या मार्गदर्शनाने चुकीच्या लोकांमुळे घडले. बऱ्याच वर्षांपूर्वी भाष्य केले गेले की, जेव्हा कलीयुग येईल तेव्हा सामान्य संसारी माणसांना सहजच आत्मसाक्षात्कार मिळेल. प्रत्येक धर्मात सांगितले की, प्रथम स्वतःला जाणा. साधकांनी खूप कष्ट घेतले; पण एवढे करूनसुद्धा त्यांना सत्य कळले नाही.

पण ते कार्य माझ्या वाट्याला आले. याबाबत लहानपणापासूनच लोकांतील हे अज्ञान मला जाणवत होते. लोक सामान्यतः काही पापभिरू, काही आक्रमक वृत्तीचे होते. हिटलरसारखेही महत्त्वाकांक्षी झालेत; पण भारताला आधी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हे जाणवले. त्यासाठी आमच्या आई-वडिलांबरोबर मीही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले; पण स्वातंत्र्यानंतरही लोक बहकलेले दिसले. ईश्वरसाधनेत लोकांनी बराच पैसा ओतला; पण त्यांना काही मिळाले नाही. याबाबत मी विचार केला की हे कसे घडवून आणावे, ते कसे कार्यरत करावे? त्यावेळी भारतात आमच्याकडे साधारण २५ लोक पार झालेले होते. आत्मसाक्षात्कारामुळे आपला काय लाभ झाला हे कळले. त्यांच्यात परिवर्तन झाले होते. त्यांना कुणीतरी सांगितले होते की, मी एक देवी आहे म्हणून ते माझी पूजा करू इच्छित होते; पण त्यांना मी नको म्हणत होते. कारण लोकांना काही समजणार नाही; पण ते माझ्या मागेच लागले व शेवटी ते आले व एका घराच्या गच्चीवर पूजा करण्यास मी संमती दिली. पूजा झाली व कार्यक्रमानंतर एक घरकाम करणारी एक स्त्री तेथे आली व मला देवीच्या नावाने संबोधू लागली. लोकांनी तिला हटकले. तिचा आवाज पुरुषी होता. ती सांगू लागली 'या साक्षात देवी आहेत, त्य तुम्हाला वाचवणार आहेत. तिचा आवाज एखादा पंडित ब्राह्मणासारखा होता. सर्व आश्चर्यचकित झाले. त्या लोकांनी तिला अनेक प्रश्न विचारले त्यानंतर ती चक्कर येऊन पडली. मी त्यांना म्हणाले तिचे काही एक ऐकू नका. त्याचा काही उपयोग नाही.

पण त्यांनी ते ऐकले नाही. म्हणाले, 'आम्हाला तुमची पूजा करू द्या.' शेवटी मी संमति दिली व पूजा करण्यासाठी ते सात ब्राह्मणांना घेऊन आले. ते पूजा करण्यासाठी थोडे घाबरले होते. ते जर सत्य नसेल तर त्यामुळे त्रास होण्याची शक्यता असते; पण पूजा करत असतानाच ते पार झाले आणि त्यांच्या हातावर थंड वारा आणवू लागला आणि म्हणाले, 'हेच ते सत्य आहे' आत्मसाक्षात्कारी आत्म्याची सर्व लक्षणे जाणवू लागली; पण मी बाकीचे काही सांगू शकत नव्हते. कारण इतर बरेच (अगुरु) लोक म्हणत 'मी असा आहे, तमका आहे.' मी सर्व उघड करू शकत नव्हते; पण हळूहळू लोक माझ्या कार्यक्रमाला येऊ लगले व त्यांना गोडी लागली आणि आश्चर्यकारकपणे सहजयोग वाढू लागला.

अशा प्रकारे सहस्रार दिवशी वा या दिवशी सहस्रार उघडले गेले ही एक महत्त्वाची घटना, एक सूक्ष्म प्रक्रिया घडली. आपल्याला माहीत आहे की, कुंडलिनी ही ३॥ वेटोळे घालून आपल्या 'सॅक्रम' (माकडहाड) मध्ये आहे; पण ती काय घडविते, काय करते व आपल्यावर काय परिणाम करते हे ठाऊक नव्हते. ती आपल्यातील सहा केंद्रांना छेदते. गणेशचक्र सोडून. जेव्हा ती सहाव्या चक्राचे सहस्राराचे भेदन करते तेव्हा ईश्वरी प्रेमाच्या सर्वव्यापी चैतन्याशी आपला योग घटित होतो.

पण ही ईश्वरी प्रेमशक्ती म्हणजे काय? तिचे कार्य काय? ही त्या मातेची शक्ती आहे. तिल आदिशक्तीची शक्ती म्हणू या. ती सर्वव्यापी अशी चैतन्य शक्ती, जी स्पंदन लहरीद्वारे (Through Vibrations) कार्यरत असते; पण हे चैतन्य म्हणजे काय? ही अत्यंत सूक्ष्म शक्ती जी तुमच्या सहस्रारातून वाहाते. सहस्रारातील सर्व हजार नाड्या (पाकळ्या) प्रकाशित होतात वा

ते चैतन्य तुमच्या शरीरातून, हातातून, पायातून, सर्व अंगातून प्रवाहित होते आणि जसजसे तुमचे चित्त सहस्रारावर स्थित होत जाते ते अधिक कार्यरत होते.

शास्त्रज्ञांनी अशी ऊर्जा शोधून काढली तिला ते क्वांटम एनर्जी म्हणतात. तिला त्यांनी क्वांटम (quantum) म्हटले का ते समजत नाही. कदाचित ती श्रीगणेशाची (चत्वारी) शक्ती असावी. शास्त्रज्ञ थोडेसे आंधळे असतात. ते कशाला काहीही म्हणतात. ते तिला क्वांटम ऊर्जा म्हणून संबोधतात. जी अतिशय सूक्ष्म आहे व तिच्यात प्रकाश असतो व ती दिसू शकत नाही. माझ्या अनेक फोटोतून तुम्हाला असे अनेक प्रकारचे प्रकाश दिसतात. ती ऊर्जा प्रकाशमय आहे. याबाबत शास्त्रज्ञही ठाम नाहीत, पण ही क्वांटम ऊर्जा म्हणजे एक प्रकारची आध्यात्मिक ऊर्जा असावी. एक प्रेमशक्ती जी सर्वव्यापी आहे. तिचे कार्य काय त्यांना ठाऊक नाही; पण तिच्यात प्रकाशाचा अंतर्भाव आहेत हे माहीत आहे. क्वांटम म्हणजे गुंडाळ्याच्या स्वरूपात (Bundle) जी वाहात असते आणि प्रत्येक बंडल म्हणजे क्वांटा असे ते म्हणतात; पण ही शक्ती जेव्हा प्रवाहित होते तेव्हा ती कार्यान्वित असते हे तुम्ही पाहिले. ती प्रत्येक स्तरावर सर्व बाजूंनी कार्य करते. ती शारीरिक कार्येही करते जेव्हा आजारी व्यक्ती माझ्यासमोर येते तेव्हा ती व्यक्ती बरी होते. हे सर्व काही सहज घडते. मला काही विचारावे लागत नाही. काही करावे लागत नाही. सर्व आपोआपच घडते. तुम्ही जर पार झालेले असाल तर ते तुमच्याकडून घडेल. कसे? तर तिला प्रवाहित करा. दुसऱ्याला देण्याचा प्रयत्न करा.

**तुम्हा लोकांमुळेच आज एवढे लोक सहजयोगात आले. सहजयोगाचा प्रसार झाला; पण एवढ्यावर थांबू नका. सर्व जगाला आपल्याला वाचवायचे आहे.** त्यासाठी जगातील ४०% लोक सहजयोगात उतरले पाहिजे. भले ते कुठल्याही राष्ट्राचे असोत, शिकलेले असोत वा नसोत, त्यांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे. याबद्दल भारतीय ग्रंथात लिहिलेले आहे आत्मसाक्षात्काराशिवाय जीवन व्यर्थ आहे. आत्मसाक्षात्कार म्हणजेच आपल्या आत्म्याचे ज्ञान. या सर्वव्यापी चैतन्याशी तुम्ही एकरूप झाल्याशिवाय ते कसे मिळणार? जेव्हा १९७० साली मी सहस्रार उघडले तेव्हा ती एक परम अशी विशेष घटना होती आणि सगळ्यात मानवात मोठी समस्या हीच होती की, त्यांचे बंद सहस्रार हे मी पूर्णपणे जाणले व खात्री पटली की त्यामुळेच ते अंधारात लढतात, त्यामुळेच अनेक गहन समस्या निर्माण होतात; पण जर त्यांचे सहस्रार उघडून त्यांचा परमचैतन्याशी संयोग झाला तर त्यांच्या सर्व समस्या सुटतील. सर्व प्रकारची विघ्ने दूर होतील व सर्व मानवजात सुखी होईल. हे सर्व मला जाणवले तेव्हा मला अतीव आनंद झाला.

पण मला कोणी जाणून घेण्यास तयार होईना. माझी बडबड त्यांना बाष्कळ वाटत होती. ते समजून घेण्यास कोणाची तयारी नव्हती. कारण कुठल्याही शास्त्रात कुंडलिनीबद्दल स्पष्ट लिहिलेले नव्हते. फक्त ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथात सहाव्या अध्यायात कुंडलिनीबद्दल लिहून ठेवले; पण तितके स्पष्टपणे नाही. कुंडलिनीद्वारा तुम्हाला आत्मज्ञान होते एवढेच म्हणाले आणि तुम्ही नेहमी जोगवा म्हणता की, आई जगदंबा उदोउदो; पण ते का गातात, गोंधळी लोक हे गाणे का म्हणतात ठाऊक नाही. त्याचा अर्थही समजला नाही, ना जाणून घ्यायचा प्रयत्न झाला. केवळ गाणे समजून गायचे. त्यात काय सांगितले ते कोणालाही समजले नाही. सर्व बाबतीत एक प्रकारचा गोंधळ होता. कुंडलिनी जागरणाबद्दल आत्मसाक्षात्काराबद्दल सर्व पुस्तकात लिहिले होते. लोक ते वाचत; पण सर्व जिथल्या तिथे. सर्व काही स्वतःच्या स्वार्थासाठी चालले होते. पैशासाठी, पदांसाठी सर्व काही करत. निरनिराळ्या संस्था उघडल्या; पण तेथे कोणी योग्य लोक नव्हते. कारण कोणी आत्मसाक्षात्कारी नव्हते. विदितामी झेनची निर्विचारतेची शिकवण, जपानमधील ताओंनी सर्वव्यापी शक्तीबद्दल, लाओत्सेंनी संतांबद्दल बरेच काही सांगितले; पण संत कसे घडवायचे, लोकांना पार कसे करायचे याबद्दल कुठेच वर्णन नाही. बाराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी व इतर अनेक संतांनी आत्मसाक्षात्काराबद्दल लिहिलेले आहे; पण ते लोकांना कसे द्यायचे याबद्दल उल्लेख नाही. तशी शक्ती कदाचित त्यांना नसावी.

**तुम्हाला ही विशेष शक्ती मिळाली आहे. ती क्वचितच लाभते; पण तुम्हाला ते शक्य झाले आहे. हे ज्ञान सर्व लोकांपर्यंत पोहोचवा व त्यांना आत्मसाक्षात्कार द्या. यातच तुमचे व त्यांचेही कल्याण आहे.** जिप्सी लोकांना हे देण्याचे कार्य चालू आहे हे पाहून आनंद वाटला. त्यांना जरुर आत्मसाक्षात्कार द्या. आजच्या या दिवशी माझी हीच इच्छा आहे. आपण सर्वांनी अगदी तळमळीने हे कार्य हाती घ्या. हे स्वतःकरता ठेवू नका. जास्तीत जास्त लोकांपर्यंत हे पोहोचवा. त्यात तुम्ही चुकणार नाही. कुंडलिनीलाही तुमच्यासारख्या आत्म-साक्षात्कारी लोकांबद्दल आदर आहे. चुकलात तरी ती क्षमा करेल, ठीक करेल.

मी एक साधी गृहिणी आहे; पण मी सहस्रार उघडण्यासाठी सतत कार्यरत होते. माझी ती धडपड चालूच होती. ते मी साध्य केले. शास्त्रज्ञसुद्धा तुम्ही ते करता हे पाहून तुमच्याकडे येतील, तुम्हाला प्रश्न विचारतील. त्यांना तुम्ही ते पटवून द्याल. तुम्हीच माझे हात बळकट करा. तुम्ही ते घडवा. **'अज्ञान' हेच सर्व समस्यांचे मूळ आहे. तुमच्या ईश्वरी प्रेमशक्तीतूनच तुम्ही ते दूर करणार.** लोकांशी संवाद साधा, विविध साधनांचा उपयोग करा. जसे मी घडविले तसे तुम्ही करा. कुठलाही भेदभाव न ठेवता सर्वांना द्या. मग ते कुठल्याही धर्माचे, कुठल्याही देशाचे असोत. निराश होऊ नका. हळूहळू सर्व घटीत होईल. जे पीडित आहेत त्यांना मदत करा. तुम्ही सर्व त्या प्रेमशक्तीचे नम्र सैनिक आहात. (Gentle soldier of love) अगदी आघाडी उघडून लोकांना आनंद द्या. अशा तऱ्हेने एक नवे बदललेले जग निर्माण होईल.

मी आपली अत्यंत आभारी आहे.

# गुरु पूजा

प. पू. श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण (सारांश)
कबेला
दि. ८ जुलै २००१

आज माझ्यासमोर गुरुपदाला पोचलेले इतके सहजयोगी पाहून एका मातेला किती आनंद होत असेल याची तुम्हाला कल्पना येणार नाही. तुम्ही लोक फार कठीण काळामध्ये सत्याचा शोध घेत आला आहात, सत्य जाणण्याचा ध्यास तुम्ही घेतला होता, म्हणूनच या कलियुगाचाच एक चांगला प्रभाव तुमच्या मनावर झाला आणि आपल्या अवतीभोवती घडत असलेल्या सर्व गोष्टींमध्ये काहीतरी चुकत आहे व आपण त्या चुकीच्या प्रवृत्तींच्या पलीकडे जाऊन जीवनाच्या मूळ सत्यापर्यंत गेले पाहिजे, असा विचार तुम्ही करू लागला.

सत्यशोधाच्या मार्गातील सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे त्याचा निदिध्यास घ्यावा लागतो, मार्गामधील अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागते. या साधनेमध्ये बाहेर कांहीच चांगले दृष्टोत्पत्तीस येत नाही व स्वतःच्या अंतर्मनाबरोबरही संघर्ष करावा लागतो. कधी कधी साधना करून काय व कधी फळ मिळणार असे निराशाजनक विचार येऊ लागतात. पण आजकालची परिस्थितीच अशी विचित्र आहे की त्याला इलाज नाही.

आजकाल जगांत सगळीकडे झगडे व वादविवाद चालले आहेत; क्षुल्लक गोष्टींबद्दल भांडणे व खून-मारामाऱ्या चालल्या आहेत. जमिनीच्या मालकीवरून एकमेकांचे खून करण्यापर्यंत प्रकार घडतात. आजकाल तर ही भांडणे संघटित होऊन गटांगटांमध्येही खुनी हल्ले होतात; कदाचित आपण हे करून विशिष्ट जातीच्या लोकांची सेवाच करत आहोत, असे त्यांना वाटत असावे. आजकाल एकूण माणसांची वैचारिक क्षमताच अत्यंत उथळ बनली आहे. म्हणूनच आजकाल सगळीकडे वातावरणच खराब व तणावग्रस्त झाले आहे व दररोज अनेक जीव मृत्युमुखी पडल्याच्या घटना कानावर येत आहेत. पूर्वीच्या काळी साधु-संताचाही जति-धर्मभेदावरून छळवाद झाला. पण आता हे लोण जगभर सगळीकडे पसरत चालले आहे. हीच परिस्थिति व सलोख्याचा अभाव घराण्यांमध्ये, संस्थांमधे, मंडळांमधेही दिसून येतो आणि एखादा गट आपले म्हणणेच योग्य व बरोबर अशा अट्टाहासामुळे आक्रमक बनतो.

सहजयोग्यांचे लक्ष सवंध जगाकडे लागले पाहिजे. तुमच्या शुद्धतेमधून परमचैतन्याची प्रेमशक्ति सगळीकडे पसरणार आहे.

मग काही लोकांना वाटू लागते की आपणही सक्रिय प्रतिकार करून अशा प्रकारांना तोंड दिले पाहिजे; मग त्यांनीही आपला गट स्थापन केला. पण त्याचाही काही फायदा न होता तेढ वाढतच राहिली. कारण अशा कलहातून खून-रक्तपातच बळावतो. बुद्ध आले तेव्हा त्यांनी अहिंसा समजावली, पण त्यावेळीही एका अतिरेकी टोळीने एका विद्यापीठावर हल्ला करून सर्व भिक्षूंना ठार केले. त्या गुंडाला आपण फार मोठे सत्कार्य केले असेही कदाचित् वाटले असेल. या कलियुगामध्ये अशा मार्गाने काहीही सुधारणा होणार नाही. कारण अशा माथेफिरूंना कोण समजावणार? ते लोक आक्रमक आहेत व सत्यापासून फार दूर जात आहेत हे त्यांच्या डोक्यांत शिरणे अशक्यच असते. म्हणून सांगून-समजावून सांगण्याचे व परिस्थिति बदलवण्याचे सर्व प्रकार अयशस्वी होत आले आहेत आणि परिस्थिति अधिकच बिघडत चालली आहे.

आजकाल सामान्य माणूस आपण कशा चुकीच्या मार्गाकडे चाललो आहोत हे समजून घेण्याच्या मनःस्थितीत नाही ही गोष्ट आपण स्वीकारली पाहिजे; त्यांच्या दृष्टीने आक्रमकपणा दाखवण्यातच शहाणपणा आहे अशी त्यांची समजूत आहे. मग यावर एकच उपाय आहे तो म्हणजे त्यांना आत्मसाक्षात्कार देणे; त्यांतूनच त्यांच्यामधे सुधारणा होऊ शकेल. तुम्ही म्हणाल 'हे कसे शक्य आहे? बंदुकीच्या धाकाखाली सतत वावरत असताना त्यांना जगणेच मुष्किल असतांना सत्य मिळवण्याचे त्यांना कसे जमणार?' पण प्रामाणिकपणे व शुद्ध मनाने ते केले की त्यांचे त्यांनाच समजेल की सर्व जग आणि मानवजात एकाच परमतत्त्वाचे अंश आहेत; हे जाणण्यांतच मनुष्यजन्माचे सार्थक आहे. पण नरसंहाराच्या मागे लागल्याने हा सोपा मार्ग त्यांना अनेक लोक बळी पडल्याशिवाय सापडण्यासारखा नव्हता.

आता आत्मसाक्षात्कार देण्याचे व त्यांमधून लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. गुरुपद मिळाल्यावर हेच तुमचे परमकर्तव्य आहे, पण सहजयोगात येऊनही सहजयोगाची

खरी महति समजून न घेतल्यामुळे बरेचजण अजून काठावरच आहेत आणि स्वतःच्या भौतिक प्रश्नातच गुंतले आहेत; लालसा अजून सुटत नाही; आपण आक्रमकपणा गाजवतो का, इतरांना त्रास देतो का, स्वतःबद्दल अनाठायी कल्पना ठेवतो कां इकडे आपण लक्ष देत नाही. **म्हणून स्वतःला स्वच्छ करून स्वतःमधील दोष जाणून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. इथूनच आत्मपरीक्षणाची सुरुवात झाली पाहिजे.** कोण खरे ध्यान करतो मला चांगले समजते. म्हणून स्वतःच स्वतःची फसवणूक करण्यात अर्थ नाही; तसे केले तर तुम्ही खऱ्या अर्थाने गुरु कसे बनणार!

गुरुपदासाठी लायक होण्यासाठी तुम्ही स्वतःशी पूर्ण प्रामाणिक राहिले पाहिजे व आपण काय करतो, कां करतो, आपल्याला काय करायला हवे याबद्दल सदैव काटेकोर राहिले पाहिजे. आपल्या प्रत्येकामध्ये षड्रिपू आहेत म्हणूनच आपण कधी कधी स्वतःचे समर्थन करण्याच्या – 'चुकीचे असले तरी मला ते करणे भाग होते, मला खोटे बोलण्याशिवाय गत्यंतर नव्हते, पैसे पुरत नाहीत म्हणून अप्रामाणिकपणा करावा लागला, नीतिमत्ता सांभाळणे मला अशक्य होते' इ. भाषा करण्याच्या – मागे लागतो. स्वतःचे समर्थन करण्याची माणसाला नसती सवय असते; पशूंचे तसे नाही, त्यांच्या सर्व प्रवृत्ति स्वाभाविक असतात; **पण माणसांना चुका करूनही वर त्यांचे समर्थन करण्याची हौस असते. आपल्या उन्नतीसाठी त्याचा कांहीही उपयोग नाही, उलट अडचणच होते.** खरे तर आत्मपरीक्षण करूनच ही चुकीची धारणा लक्षांत घेतली पाहिजे. स्वतःला शुद्ध करण्यासाठी आधी स्वतःकडे निरपेक्षपणे, स्वच्छपणे पाहता आले पाहिजे. आरसाच खराब असला तर त्यातील प्रतिमाही खराब दिसणार व चेहऱ्यावरचे दोष दिसणार नाहीत. म्हणून प्रथम सत्य समजले पाहिजे व त्याच्यासमोर आपण कसे आहोत हे समजल्यावरच तुम्ही स्वतःला सुधारू शकता. म्हणूनच 'सत्या'बरोबर आपण एकरूप असले पाहिजे. उदा. आरसा पाहिल्यावर चेहऱ्यावर काही डाग पडल्यासारखे दिसले तरी आपला चेहरा तसा नाही हे आपण विसरत नाही व आरशावरच डाग असल्याचे तुम्हाला समजते. म्हणून स्वतःच्या वागण्याचे समर्थन करण्याची संवय सुटली पाहिजे.

तुम्ही आता नीतिमत्तेच्या, चांगुलपणाच्या, प्रेमाच्या व करुणेच्या मार्गावर आला आहात, तेव्हा स्वतःकडे सदैव लक्ष ठेवणे फार महत्त्वाचे आहे. आपण कसे वागतो-बोलतो-चालतो इकडे नीट लक्ष द्या व स्वतःला फसवण्याच्या फंदात पडू नका. दुसऱ्यांना कसे वागायचे तसे वागू द्या पण तुम्ही स्वतःची प्रतिष्ठा व सन्मान जपा. म्हणून आंतून-बाहेरून स्वच्छ होण्यासाठी आत्मपरीक्षण ही पहिली पायरी आहे.

आत्मपरीक्षण करताना तुमची प्रेमभावना उपयुक्त ठरते. अप्रिय, आक्रमक वृत्तीच्या वा तापट स्वभावाच्या व्यक्तीबद्दल तुम्हाला आपुलकी वाटणे जड जाते. मग तुम्ही स्वतःवर प्रेम कसे करू शकणार? स्वतःमध्येही असेच दोष असल्यामुळे स्वतःवरच प्रेम कसे जमेल? म्हणून **पहिली गोष्ट म्हणजे स्वतःबद्दल शुद्ध प्रेम करायला शिकणे.** विशुद्ध प्रेम हृदयांत निर्माण होणे ही फार महान् सिद्धी आहे. स्वतःचा सुंदर बंगला, सज्ज बेड-रूम, भरपूर ऐश्वर्य मिळवल्यावरही आपल्याबद्दल, स्वतःबद्दल असे प्रेम निर्माण होणार नाही, कारण शुद्ध प्रेमाला या बाह्य गोष्टींची आवश्यकताच नसते. स्वतःबद्दलचा आनंद उपभोगणे यासारखी दुसरी आनंददायक गोष्टच नाही. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर आपले 'स्वरूप किती सुंदर आहे हे तुमच्या लक्षांत आले पाहिजे व त्या स्वरूपाबद्दल तुमच्य हृदयात आनंद निर्माण झाला पाहिजे. मग बाह्यांतील कुठल्याही गोष्टींची तुम्हाला फिकीर वाटणार नाही. तुमच्याजवळ शुद्ध प्रेमाची जी शक्ति आहे तीच स्वतःसाठी वापरा. तुम्ही स्वार्थीपणाच्या भावनेतून विचार करता, दुसऱ्याबद्दल सहानुभूति बाळगत नाहीं किंवा अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करता तेव्हा ही स्वतःबद्दलची प्रेमभावना विसरून त्या प्रवृत्तींवर प्रेम करत असता हे लक्षात घ्या. पण तुमचा आत्मा पूर्ण शुद्ध आहे व तो सर्व सुंदर व शुद्ध गोष्टींवरच प्रेम करतो.

आत्मा जाणल्यावर – आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर – हेच तुम्हाला शिकायचे आहे; या आत्म्याची महति व वैशिष्ट्य काय आहे हे लक्षांत घ्यायचे आहे. मग तुम्ही स्वतःबद्दल चुकीच्या भावना बाळगणार नाही, स्वतःच्या चुकांचे समर्थन करण्याचा प्रयत्न करणार नाही कारण ते सर्व आत्म्याशी सुसंगत नाहीं हे तुम्ही ओळखलेले असते. स्वतःला अगदी प्रमाणिकपणे व अलिप्तपणे बघाल तर हे स्व-रूप किती सुंदर व तेजस्वी आहे हे समजल्याचे तुमचे तुम्हालाच नवल वाटेल. हे एकदां घटित झाल्यावर आजूबाजूच्या पूर्वी लक्षांत न आलेल्या अनेक गोष्टी तुमच्या लक्षात येतील. अशीच एक गोष्ट म्हणजे प्रेम हे सर्वासाठी आहे हे तुम्हाला जाणवेल. **परिणामस्वरूप तुमच्यामधील प्रेम स्वतःपुरते मर्यादित न**

**... आत्मसाक्षात्कार मिळालेली व्यक्ती नम्र झालीच पाहिजे.**
**नम्रता हीच आत्मज्ञानाच्या परिपक्वतेची खूण आहे.**
**फळांनी लडलेला वृक्ष जमिनीच्या दिशेकडे झुकतो तसे तुम्ही झाले पाहिजे.**

**राहता सगळीकडे पसरेल.** पैशासाठी, फायद्यासाठी किंवा सत्तेसाठी असे हे प्रेम संकुचित न राहता **प्रेमापोटीच प्रेम असे ते सुगंधित होईल.** अशा प्रेम-व्यवहारामधून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. त्याच्यामागे दुसऱ्याला आकर्षित करण्याची किंवा स्वतःचा मोठेपणा मिरवण्याची किंवा दुसऱ्यावर उपकार करण्याची वगैरे कसलीही मतलबी भावना नसते. या सगळ्या कल्पना कुचकामी असतात.

खरे प्रेम हे प्रेमापोटीच निर्माण होते. कुणी म्हणेल ''माताजी, एखादा दुष्ट असल्याचे माहीत असूनही त्याच्याबद्दल प्रेम कसे वाटणार?'' पण तुम्ही त्याच्यापासून दूर रहा, त्याच्याकडे लक्षच देऊ नका; तुमचे प्रेम शुद्ध असेल तर तो बदलेलही; आणि नाहीं बदलला तरी तुम्ही त्याचा विचार सोडून द्या. जे तुमच्याबरोबर या प्रेमसागरात उतरलेत तेच तुमचे खरे मित्र; त्यांचीच आज जगाला जरूरी आहे. दुष्ट, कपटी, भोंदू, आक्रमक लोकांना इथे थाराच नाही. शुद्ध प्रेमाने आंतून-बाहेरून चिंब झालेल्या लोकांची आज जरूर आहे.

प्रेमाबरोबरच शुद्धतेला कसे महत्त्व आहे हे आपण पाहिले. शुद्धता म्हटली की लोकांबरोबर पोटांत कांही न ठेवता मोकळेपणाने वागणे, पारदर्शक व्यवहार करणे असे बऱ्याच लोकांना वाटते; पण तेवढ्याने भागत नाही, खरी शुद्धता तुमच्याजवळ असेल तर तुमच्या संपर्कात येणारे लोकही तुमच्यामुळे शुद्ध झाले पाहिजेत. सहजयोगातही स्वतःला फार मोठा सहजयोगी झाल्यासारखे वाटत असेल तर त्याने आपण किती लोकांना जागृति दिली, सहजयोगाचा प्रचार करण्यासाठी किती कार्यक्रम केले, आपल्यासारखे किती लोक आपल्यामुळे शुद्ध झाले असा विचार करावा. कारण **आपल्यामधील शुद्धता अशी सगळीकडे पसरली पाहिजे. त्यासाठी आपल्यात स्वतःच्या शुद्धतेची खात्री असली पाहिजे.** शुद्धता हीहि एक शक्ति आहे; एखादा अगदीच खराब मनुष्य असला तर त्याच्यावर तुमच्या शुद्धतेचा कदाचित् काहीच परिणाम होणार नाही; हरकत नाही; पण इतर संवेदनशील माणसांवर त्याचा परिणाम होऊन ते सहजयोगात येतील. तुमच्याकडून ते घटित होते कां हे पहात चला. **तुम्ही स्वतः शुद्ध झालात की परमचैतन्याची प्रेमशक्ति तुमच्यामधून वाहू लागते.** अशुद्ध माध्यमांतील चक्रावरच्या अडथळ्यांमुळे तसे न घडण्याची शक्यता असते. शुद्ध प्रेम, शुद्ध आचरण असलेल्या व्यक्तीमधील आध्यात्मिकता सर्वांना आपल्याकडे खेचून घेते. असा माणूस कुठेही समस्या उभी करत नाही, त्याच्यामुळे कसले प्रश्न निर्माण होत नाहीत.

सहजयोग्याचे चारित्र्य असे असावे की त्यात स्वतःच्या व इतरांच्या शुद्ध जीवनाचा आदर करावा. त्यासाठी सहजयोग्यांनी स्वतःकडे सतत जागृत होऊन लक्ष द्यावे, स्वतःला अधिकाधिक स्वच्छ करावे आणि स्वतःबद्दल अलिप्त होऊन आपण कसे आहोत, काय करत आहोत, किती प्रगति व सुधारणा केली इ. बद्दल सतर्क रहावे.

पूर्वीच्या काळचे गुरु शिष्यांना आत्मसाक्षात्कार देण्याबद्दल विशेष उत्सुक नसत. हिमालयासारख्या एकान्त, निर्जन ठिकाणी राहून तपःसाधनेचा आनंद मिळवण्याच्या प्रयत्नांत ते मग्न रहात. पण आपल्याला मिळालेला परमोच्च आनंद इतरांनाही मिळवून देतो तोच खरा गुरु असे मी समजते. सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य करण्याची तळमळ खऱ्या गुरुला असते. **सहजयोग आता अशा अवस्थेला आला आहे की आपले लक्ष सबंध जगाकडे लागले पाहिजे.** एक-दोन किंवा थोडे सहजयोगी बनून हे होणार नाही; म्हणून सहजयोग जगभर पसरला पाहिजे; त्यामधील सर्व अडथळे तुम्हालाच पार करायचे आहेत; म्हणून आधी स्वतःची स्थिति सुधारण्याच्या मागे लागा.

मला घरगुती तक्रारींबद्दल बरीच पत्रे येतात (इथें श्रीमाताजी हसत-हसत गमतीदार उदाहरणे देतात.) पण आता गुरु झाल्यावर हे तुम्हाला शोभा देत नाही. शिवाय आंतून शुद्ध झाल्यावर तुम्ही नम्र झाले पाहिजे. पण नेमके ह्याच्यापेक्षा उलटे चित्र दिसते, म्हणजे कुणाजवळ काही अधिकार, प्रसिद्धि, कला, ज्ञान असे कांही विशेष असले तर तो स्वतःला मोठे समजू लागतो! म्हणून सहजयोगी म्हणून आपल्या शुद्धतेला तुम्ही फार जपले पाहिजे.

तुम्हाला स्वतः गुरु झालो असे वाटत असेल तर तसे समजा; मी तसे सांगण्याची जरूरी नाही. पण एवढे नक्की म्हणेन कीं आधीं तुम्ही उत्तम शिष्य बनले पाहिजे, **स्वतःला आधी शिष्य बनवले पाहिजे.** म्हणून स्वतःकडे कठोरपणाने पाहून बघा की आपल्यामधे शिष्याचे गुण आले आहेत का? हे आत्मपरीक्षण स्वच्छ हृदयाने व समजूतदारपणे करायला हवे. कारण तुम्ही अवतारी संतपुरुष नाही;

**सर्वप्रथम तुमचा स्वतःवर विश्वास पाहिजे.**
**तुमचा स्वतःवर विश्वास नसेल तर तुम्ही काहीही करू शकणार नाही.**
**तुम्हाला कोणत्याही प्रकारची भीति असायला नको. तुम्ही आत्मनिरीक्षण केले पाहिजे.**
**तुमच्या आत काय चालले आहे ते पाहा.**

तसे अवतारी संत जन्मतःच अत्यंत शुद्ध असतात; तुम्ही लोक साधारण माणसे आहात आणि उन्नतीच्या अत्युच्च स्थितीवर येण्यासाठी धडपडणारे साधक आहात. म्हणून सतत काटेकोरपणे, अलिप्तपणे स्वतःच्या स्वच्छतेबद्दल काळजी घ्या आणि शुद्धता व प्रेमाने परिपूर्ण सहजयोगी बनण्याचा उत्तरोत्तर प्रयत्न करा. हे शुद्ध प्रेम सागरासारखे असते, त्याला मर्यादा, अपेक्षा, परतफेड काहीही नसते. मग तुम्ही त्या सागराचाच अंश बनाल.

पूर्वीच्या काळी गुरुंच्या हातात सतत दंडा असे, कुणी शिष्याने चूक केली तर त्याला त्या दंडुक्यानेच मार मिळत असे. संगीत, कुस्ती वगैरे शिकवणाऱ्या गुरुंचाही हाच प्रकार होता. अध्यात्मिक क्षेत्रातही शिष्यांना अत्यंत कडक शिस्तीत ठेवले जात होते. त्या गुरुंचा उद्देश वाईट नसला तरी मला ते खटकते. पण सहजयोग या बाबतीत जरा वेगळा आहे; त्यामधे राग, क्रोध, तिरस्कार यांच्याऐवजी सर्व व्यवहार प्रेमामधून चालतो. हाच सहजयोगी गुरु व इतर गुरुंमधील महत्त्वाचा फरक आहे. सहजयोगी गुरु शिष्यांना मारपीट करत नाही, त्यांच्यावर ओरडत नाही वा रागावत नाही. प्रेमामधे फार मोठी शक्ति असते; कांही विचित्र लोकांवर त्याचा उपयोग नसेल, पण अशा लोकांकडे दुर्लक्ष करा. परमेश्वराने त्याच्या अपरंपार प्रेमामधूनच मानव निर्माण केला म्हणूनच माणसामधे प्रेमापुढे शरण जाण्याची व प्रेमाचा आनंद लुटण्याची स्वाभाविक प्रेरणा असते.

सहजयोग्यांनी विशेष करून ही प्रेमाची शक्ति जाणली पाहिजे; मग ती तुमच्यामधेही जागृत होईल. कांहीजणांमध्ये ती जन्मतःच असते तर कांही जण आत कमी पडतात. हे परमचैतन्य दुसरे कांही नसून परमेश्वराची प्रेमशक्तीच आहे, तिला 'मातेचे प्रेम' असेही म्हणता येईल. ही शक्ति अशा कांही सूक्ष्म पद्धतीने व हळुवारपणे कार्य घडवून आणते की आपल्याला तो एक 'चमत्कार' वाटावा. तिचे कार्य कसे चालते हे न समजल्यामुळे आपण त्याला चमत्कार म्हणतो.

म्हणून सर्वप्रथम तुम्ही आपल्यामधे ह्या प्रेमशक्तीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करा. या बाबतीत एक गोष्ट नीट लक्षात घेतली पाहिजे. शुद्ध प्रेमशक्तीचा अनुभव आनंददायक असतो, दुसऱ्याच्या भल्यासाठी असतो आणि तिचे कार्य सूक्ष्मपणे चालते. तुम्ही सहजयोगामधे कसे आलात, तुम्हाला आत्मसाक्षात्कार कसा मिळाला व सहजगोगमध्ये तुमची प्रगति कशी होत गेली हे सर्व आठवलेत की हे तुमच्या लक्षात येईल. हे सर्व आपल्यामधील प्रेमबीजाला अंकुर फुटावे तसे घटित झाले आणि त्याला प्रेमाचेच खतपाणी मिळाल्यामुळे त्याची वाढ झाली. अशा तऱ्हेने आपल्याला या प्रेमशक्तीची उमज पडली आणि त्याच्या आनंदाचा अनुभव मिळाला. आता गुरुपद मिळाल्यावर किंवा त्यासाठी लायक बनवल्यावर तुम्ही प्रेमाचे मूर्तिमंत रूप बनले पाहिजे. आजपर्यंत कोणत्याही गुरुला मान्य नसलेली ही गोष्ट मी तुम्हाला सांगत आहे. त्यांनी आपल्यामधील सूक्ष्म तत्त्वांचे ज्ञान सांगितले. सहजयोगांमधून तुम्हाला मिळालेले ज्ञान फार पूर्वीपासून अनेक गुरूंनी सांगून ठेवले आहे, पण प्रत्येकाने त्याचे थोडे-थोडे ज्ञान दिले. आता सहजयोगांत तुमच्या समस्त अस्तित्वाचे, सर्व नाड्यांचे व चक्रांचे संपूर्ण ज्ञान तुम्हाला मिळाले आहे आणि तेच 'सत्य' आहे. पूर्वी कधीच कुणाला ते मिळाले नव्हते; कारण पूर्वीच्या गुरूंना ते देणे योग्य वाटले नसेल किंवा त्यांनाच स्वतःला ते पूर्ण माहीत नसेल. सहजयोगांत तुम्हास मिळालेले ज्ञान हे फार सूक्ष्म असले तरी सत्य आहे आणि तुम्हाला ते सहज प्राप्त झाले आहे.

एवढे महान ज्ञान मिळाल्यावर ते फक्त मनात न ठेवता ते तुमचे अध्यात्मिक जीवन बनले पाहिजे. आणि ते होण्यासाठी तुमची प्रेमशक्ति कार्यान्वित करा; दुसऱ्याबद्दल प्रेमभावना ठेवली की दुसऱ्यांना खरी मदत करण्यासाठी तुम्ही तत्पर व्हाल, त्यांच्या चक्रामधे कुठे काही दोष असले तरी त्यांच्यावर न रागवता, त्यांना नावे न ठेवता ते दूर करण्यासाठी प्रयत्न कराल व सुधारण्यासाठी मदत कराल. हे सर्व प्रेमापोटी करण्याचीच भावना तुमच्या मनात प्रबळ होईल. मग तुम्हाला कसली भीति वा शंका वाटणार नाही. तुमच्यामधील सद्भावना त्या व्यक्तीला जाणवेल आणि त्याला सत्य समजेल. ''मी आत्मा आहे'' हेच ते एकमेव सत्य. दुसऱ्याला तुम्ही जागृति देता तेव्हा तुम्ही त्याला प्रकाशांत आणता हाच कार्याचा अर्थ. आजकाल प्रत्येकजण आपापल्या प्रपंचात मग्न आहे; सहजयोगाच्या प्रसारासाठी सवड मिळत नाही असे प्रत्येकाला वाटते. काहीही असले तरी माझी खात्री आहे की तुम्हाला मिळालेली शक्तिच तुमच्याकडून कार्य करून घेणार आहे, ती स्फूर्ति मिळून तुम्ही खूप कार्य करण्यामधे अग्रेसर व यशस्वी व्हाल आणि समस्त मानवजातीच्या उद्धाराचे माझे स्वप्न साकार होईल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

**आत्मा हे परमेश्वराचे प्रतिबिंब आहे.**
**जेव्हा तुमच्यातील आत्मा पूर्णपणे त्यांचे सौंदर्य प्रतिबिंबित करतो तेव्हा तुम्ही फक्त देणारे होता.**
**ज्याला काही हवे आहे, अशी व्यक्ती तुम्ही राहात नाही.**
**इतके तृप्त होऊन तुम्ही फक्त देणारे होता.**

# श्रीकृष्ण पूजा

प. पू. श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण (सारांश)
कन्हानो हरी
दि. २९ जुलै २००१

**अनन्यभक्ति हृदयांत पूर्ण मुरल्यावरच तुम्ही परमात्म्याबरोवर एकरूप होणार आहात व तेच तुमचे लक्ष्य असले पाहिजे.**

आज आपण श्रीकृष्णांची पूजा करण्यासाठी एकत्र जमलो आहोत. श्रीकृष्ण खरं तर साक्षात विराटच होते आणि प्रत्यक्ष मैदानात न उत्तरताही त्यांनी अधर्म प्रवृत्तींबरोबर लढा दिला.

श्रीकृष्णांचे अवतरणांतून एका सुंदर, सर्जनशील व प्रेममय जीवनाचे दर्शन मिळते, त्यांचे नीट आकलन होणें अवघडच आहे. उदा. कुरुक्षेत्रावर युद्ध सुरू होण्यापूर्वी अर्जुनाला आपल्यासमोर आपलेच मित्र, सगेसोयरे व गुरु उभे ठाकल्याचे पाहून विषाद वाटला, या सर्वांना आपणच ठार मारणार आहोत या कल्पनेने तो गर्भगळित झाला व हे धर्माचरण आहे का अशा संभ्रमांत पडला. म्हणून गीतेमध्ये सुरवातीलाच स्थितप्रज्ञ व्यक्तीची लक्षणे श्रीकृष्णांना सांगावी लागली. त्यांनी समजावले की स्थितप्रज्ञ माणूस कसल्याही परिस्थितीत स्वतः पूर्ण शांत असतो. ही स्थिति प्राप्त करून घेणे हाच त्यांनी सांगितलेला गीतेमधील ज्ञानमार्ग. खरे तर हाच सहजयोग आहे आणि त्यातूनच तुम्हाला जीवनाचे सर्व सूक्ष्म ज्ञान होते.

श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेल्या उपदेशामधें वरवर पाहता विरोधाभास असा दिसतो की एका बाजूने ते अध्यात्मिकता व वैराग्याबद्दल सांगतात आणि दुसऱ्या बाजूने अर्जुनाला शस्त्र धारण करून युद्ध करण्याचा आग्रह करतात. पण श्रीकृष्णच त्याचे निरसन करताना सांगतात की आत्मसाक्षात्कार मिळवून तुमची चेतना ऊच्च स्थितीला पोचली की सर्वकांही तुमच्या दृष्टीनें व्यर्थ वाटूं लागते. म्हणून ते अर्जुनाला त्या क्षणी युद्ध करणे हाच त्याचा धर्म आहे हे बजावतात; वर हेहि सांगतात की त्याचे शत्रू-लोक अगोदरच मेलेले असल्याने त्यांना मारणारा तो नाहींच. श्रीकृष्णांनी त्याप्रसंगी उल्लेख केलेला धर्म म्हणजे लौकिक धर्म नसून मनुष्यप्राण्याला सतत चाललेल्या उन्नतीच्या प्रगतीकडे नेणारा धर्म आणि त्याचे रक्षण करण्यासाठींच त्याला युद्ध केलेच पाहिजे असा उपदेश होता. अर्थात आत्मोन्नतीच्या विरोधांत कार्य करणाऱ्या शक्तींचा नायनाट करणें हेच अर्जुनाचे कर्तव्य असल्याचे ते स्पष्ट करतात. त्यामध्ये माणसामधील तीन शक्तींचा, त्यांतील मध्यमार्गामधील उन्नतीच्या मार्गाकडे नेणाऱ्या शक्तीचाही उल्लेख आहे. तुम्हाला हे सर्व माहीत आहेच. उन्नतीच्या मार्गावर अग्रेसर होताना इतर शारीरिक, भौतिक, मानसिक व भावनिक प्रभावांचे अडथळे प्रयत्नपूर्वक दूर करावे लागतात आणि अशा साधकांचे आक्रमक, क्रूर व भुलावण करणाऱ्या शत्रूंपासून रक्षण करणें व अध्यात्मिक प्रेरणा जागृत ठेवणें हाच त्यांचा उद्देश होता.

**सहजयोगामधें भक्ति, कर्म आणि ज्ञान हे तीन्ही मार्ग सामावले आहेत.** भक्तीमधें श्रद्धेनें भगवंताचे पूजन व कीर्तन करणें, व्रत-उपवासासारखी कर्मकाण्डे इ. अनेक साधना येतात व बहुतेक लोकांना हा मार्ग आवडतो, अनेक धर्मांमधें त्याचे महत्त्व सांगितले आहे. त्यामधें परमेश्वराशी पूर्ण समर्पण अधोरेखित आहे. पण ज्या परमेश्वराची भक्ति करायची त्याच्याबरोबर आपला योग कसा साधायचा हे लोकांच्या लक्षांत येत नाही.

दुसरा मार्ग कर्मयोग, म्हणजे आपली सर्व कर्मे अलिप्त मनानें करणें. कर्म केल्याशिवाय आपण राहू शकत नाही. पण हा मार्ग म्हणजे सर्वसाधारण समजूत अशी की तीर्थयात्रा करणें, तीर्थस्नान करणें, साधुमहात्म्यांचे दर्शन घेणें, पूजा-पाठ व प्रार्थना करणें व अनेक कर्मकाण्डे करत राहणें हाच कर्मयोग. सहजयोगाच्या दृष्टीने असा मनुष्य उजव्या बाजूचा होतो. उजव्या बाजूचे लोक अहंकारी, तापट असतात व स्वतःला मोठे समजणारे असतात. पण श्रीकृष्णांनी सांगितले आहे की कर्म तुम्ही करत असला तरी त्याची फलप्राप्ति तुमच्या हातांत नसते. अर्थात त्यांनी हे असंदिग्ध शब्दांत सांगितले, कारण स्पष्ट शब्दांत सांगितले असते तर लोकांना समजले नसते. म्हणून पुण्य कर्म केली तरी परमेश्वराचे आशीर्वाद मिळणारच असे समजू नका असे त्यांनी सांगितले, मग लोकांच्या मनात प्रश्न आला की कर्म करणेंच बंद करावे का की

त्याच्या फळांचा त्याग करायचा? हा संदेह लोकांच्या मनांत आला की त्यांची विवेकशक्ति जागृत होईल म्हणूनच श्रीकृष्णांनी त्यांच्या चतुर पद्धतीने हे सांगितले.

तिसरा मार्ग विवेकशक्तीचा, म्हणजेच ज्ञानमार्ग. हा मध्य नाडीचा उन्नतीचा मार्ग. या मार्गाने माणसामधील जाणीव उन्नत होऊन वरच्या स्तरावर येते व मानसिकदृष्ट्या तो उच्च पातळीवर येतो आणि जीवनांतील फालतू गोष्टीपासून पूर्णपणे अलिप्त होतो. त्याशिवाय **उन्नतीला पोषक नसणाऱ्या, दूषित करणाऱ्या सर्व विरोधी शक्तींबरोबर मुकाबला करण्यासाठी सिद्ध होतो.** त्यासाठी आवश्यक असणारी सर्व शक्ति व बळ त्याला परमात्म्याकडून मिळते. ही एक प्रत्यक्ष स्थिति आहे; नुसते कोरडे शब्दज्ञान नाहीं. ही स्थिति ज्याने प्राप्त करून घेतली आहे त्याला शुद्ध आत्मज्ञान व सर्व सूक्ष्म ज्ञानही मिळालेले असल्यामुळे तोच खरा ज्ञानमार्गी. बऱ्याच लोकांना वाटते की, हा मार्ग सर्वसामान्यांना जमण्यासारखा नाहीं आणि मोजके विशेष साधकच त्यांत यशस्वी होतात. पण ही चुकीची धारणा आहे. सत्य जाणण्याचे खरे ज्ञान हीच मानवाच्या उत्क्रान्तीच्या प्रवासाची शेवटची पायरी आहे व त्या प्रक्रियेची सर्व व्यवस्था मानवामध्ये मुळातच तयार करून ठेवलेली आहे. पण माणसामध्ये त्याबद्दल आत्मविश्वास नसल्यामुळे तो पूजापाठ, तीर्थस्नान किंवा इतर तत्सम कर्मकाण्डी मार्गातच समाधान मानतो. आजपर्यंत जे कांहीं पुराण-ग्रंथांत लिहून ठेवले होते किंवा वंशपरंपरेने रूढ झाले होते किंवा स्वप्रयत्नांनी इकडून तिकडून तुम्ही मिळवले तेवढेच ज्ञान तुम्हाला होते. पण हे **शुद्ध व पूर्ण ज्ञान उन्नतीच्या तुमच्यामधील यंत्रणेमधूनच मिळणारे असते व त्या स्थितीमध्ये तुम्ही दृढपणे प्रस्थापित व्हायचे आहे.** त्याच्याबद्दल नुसत्या चर्चा करून किंवा शंका घेऊन कांहींच फायदा होणार नाहीं. हे आत्मज्ञान मिळवण्याचा प्रत्येक मनुष्यप्राण्याचा अधिकार आहे; गरीब-श्रीमंत, मोठा-लहान, शिकलेला-आशिक्षित हा भेदभाव त्याच्या आड येत नाही; फक्त त्यासाठी नम्र शुद्ध इच्छा हवी. तुम्ही बऱ्याच लोकांनी हे प्रत्यक्ष अनुभवले आहे; त्यातून तुम्हाला स्वतःबद्दल व इतरांबद्दल पूर्ण ज्ञानही मिळाले आहे; तसेच आजूबाजूला जे कांहीं चालते त्याचेही तुम्हाला नीट आकलन होते. पण ही स्थिति सतत टिकवण्याची खबरदारी तुम्ही घेतली पाहिजे व पूर्णपणे निःशंक बनले पाहिजे (निर्विकल्पावस्था). श्रीकृष्णांनी हेच सांगितले आहे; अर्थात त्यांच्या चातुर्य गुणानुसार त्यांनी इतर मार्ग सांगितले असले तरी त्यांचा भर ज्ञानमार्गावरच आहे.

**सहजयोगांमधेही आपण ज्ञानमार्गीच आहोत;** म्हणून प्रत्येकाने सहजयोगाचे संपूर्ण ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे; तसे झाल्यावरच तुम्ही खऱ्या अर्थाने 'ज्ञानी' बनाल. मनुष्य मानवी चेतनेच्या पलीकडे गेल्यावरच उत्क्रान्तीचा हा टप्पा गाठू शकेल हेच श्रीकृष्णांनी सिद्ध करून ठेवले आहे. मानवांचे व्यवहारातील ज्ञान-अमुक अमुक ठिकाण किती दूर आहे, तिथे कुठली गाडी जाते, या कार्पेटची किंमत किती असेल इ. इ. किंवा सूर्यमालेत किती तारे आहेत किंवा सृष्टीमध्ये किती सूर्यमाला आहेत इ. ही – सीमित आहे; पण या ज्ञानामधें अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म सृष्टीची संपूर्ण माहिती त्याच्या जाणीवेमधें येते. हेच संपूर्ण ज्ञान आपल्याला मिळवायचे आहे.

हे ज्ञान मानवी बुद्धि वापरून किंवा गहन ग्रंथांचा अभ्यास करून मिळणार नाही. कारण हे ज्ञान 'शाश्वत' आहे; त्यांच्यात कांहीं बदल वा फेरफार कधींही होणार नाहींत. ते आहेच आहे व आपल्याला फक्त समजून घ्यायचे आहे एवढेच. ज्यांना ही स्थिति प्राप्त नाहीं त्यांना हे समजणार नाहीं व त्यांच्या शंका-कुशंका संपणार नाहीत, ते तुम्हांला नांवेही ठेवतील; पण **तुमच्या दृष्टीमधें, बुद्धीमधें व हृदयांत आता प्रकाश आला आहे आणि तुम्हाला सत्य समजले आहे व तुम्ही ते जाणले आहे. त्या प्रगतीमधें श्रीकृष्णांच्या सांगण्याप्रमाणे तुमची वारंवार परीक्षा घेतली जाते.** ते म्हणतात ''तुम्ही मलाच शरण या; मला पानें, पाणी, फुले कांहीही देऊन माझी प्रार्थना करा, मी ते सर्व स्वीकारेन.'' याचा अर्थ नीट समजला पाहिजे; अमुक दिलेत तर मी तमुक देईन असे ते म्हणतच नाहींत तर म्हणतात **''तुमच्या प्रार्थनेमध्ये, पूजेमध्ये, शरणागतीमध्ये 'अनन्यभक्ति' ठेवा.''** अनन्यभक्ति नीट

**सहस्राराच्या पार-दर्शिकत्वामुळे तुम्ही तुमचे हृदय, मन पाहू शकता आणि त्यातील गुणदोष पूर्णपणे व स्पष्टपणे बघू शकता. खरोखरीच जर तुम्हाला त्या पातळींची शुद्ध इच्छा असेल तर सहस्राराचे पारदर्शकत्व प्राप्त होईल.**

समजली पाहिजे; अनन्य म्हणजे 'दुसरा कोणी नाही'; म्हणजे 'माझ्याशी संपूर्ण एकरूप व्हा,' हाच योग; अनन्यभक्तीची ही परिणति आहे. श्रीकृष्णांना ही भक्ति अपेक्षित आहे. बरेचजण भक्तीचा हा अर्थ लक्षांत घेत नाहींत; भगवे कपडे घालून, हरेराम हरेकृष्ण जप करून, तुळशीमाळा गळ्यांत घालून हे मिळत नाही. **अनन्यभक्ति हृदयांतून झाली आणि ती पूर्णपणे मुरली तरच तुम्ही परमात्म्यांबरोबर एकरूप होता आणि तेच तुमचे लक्ष्य असले पाहिजे.** मगच तुम्हाला त्याचे आशीर्वाद – शांति, समभाव, समतोल, आनंद – मिळतात. तसे अनेक संस्था काढून समाजसेवेसाठी अविश्रांत धडपड करणारे बरेच लोक असतात; त्यांचे नांवही होते पण त्यांना ही शांति मिळत नाहीं. अनन्य भक्तीमधून मिळणारा आनंद अमर्याद असतो, त्याचे शब्दांतून वर्णन करणें अशक्य आहे; त्यातून चिरंतन शांति निर्माण होते आणि ती सर्वत्र पसरते; त्यामुळेच लोकांमधील क्रौर्य व सूडाची भावना दूर होईल व लढाया बंद होतील. पण सर्वांत मुख्य म्हणजे तुम्हाला समग्र ज्ञानबरोबरच एक शक्तीही मिळते, त्यांतून तुम्हाला सर्व सूक्ष्म ज्ञान – स्वतःबद्दलचे व इतरांबद्दलचेही – मिळते. हे ज्ञान पुस्तकांमधून किंवा शाळा-कॉलेजांतून मिळण्यासारखे नाही; तो ज्ञानाचा सागर तुमच्यामध्ये आहे; तुम्हाला काय व किती हवे असेल ते सर्व त्याच्यातून मिळणार आहे आणि हेच खरे ज्ञान आहे. मग तेच ज्ञान दुसऱ्यांना देण्याची उर्मि तुम्हाला येत असते. मग बँका, पैसा, जगातील श्रीमंत व्यक्ति इ. माहितीमध्ये तुम्हाला रस वाटत नाहीं; जीवनाचा तुमचा दृष्टिकोनच बदलून जातो. ह्या स्थिततीवर तुम्हाला यायचे आहे.

आतां हा अमेरिकेचा देश सतत कांहीं ना कांहीं मिळवण्याच्या कामांत गुंतला आहे. सतत खटपटींत मग्न आहे. पण इथले लोक पाहिले तर तरुण वयांतच ते ड्रग्सच्या आधीन होत आहेत, महिला बाहेरख्याली होत चालल्या आहेत, कुटुंब-व्यवस्था कोलमडत आहेत, मूळ रहिवाशीच नाहीसे होत आहेत, युद्धाची भाषा वाढत्या प्रमाणावर होत आहे आणि शांति दूरच आहे. पण एक ना एक दिवस उगवणार आहे आणि त्यांच्या अशा सर्व चुका त्यांना समजणार आहेत. मग ते सहजयोगाकडे वळतील आणि अनेक साक्षात्कारी लोक तयार होतील. कारण ही श्रीकृष्णांची भूमि आहे आणि इकडे त्यांचे लक्ष आहे. सहजयोगी बनल्यावरच इथल्या लोकांना शांति, समाधान आणि आनंद म्हणजे काय ते समजेल;पैसा, गाड्या इ. बद्दलची न संपणारी लालसा कमी होईल आणि परमात्मा जाणण्याची शुद्ध इच्छा त्यांच्या मनांत निर्माण होईल. श्रीकृष्णांची भूमि असल्यामुळे हे कार्य घटित होणारच!

श्रीकृष्णांच्या कार्यामधील वैशिष्ट्य हेच की नीति-धर्मानुसार चालणाऱ्या सर्वांचे त्यांनी रक्षण केले आणि त्याच्या विरोधांत असणाऱ्या राजे-रजवाड्यांची बाजू कधींच घेतली नाही! म्हणूनच दुर्योधनाचे आग्रही आमंत्रण न स्वीकारता ते दासीपुत्र विदुराच्या घरी प्रेमाने गेले; दुर्योधन बलाढ्य पण अधर्मी होता तर विदुर साक्षात्कारी होता. हा चांगल्या-वाईटामधील विवेक तुमच्यामधे जागृत होतो व तुमच्या स्वभावाचे एक अविभाज्य अंग बनतो; मग अयोग्य आचरण तुमच्याकडून होणारच नाहीं. ही श्रीकृष्णांनी तुम्हाला दिलेली देणगी आहे; त्यातून तुमची व्हायब्रेशन्सची संवेदनाही तीक्ष्ण बनते, आणि योग्य-अयोग्य याची तुम्ही अचूक पारीख करूं शकता. त्यामुळे तुम्ही समाधानी राहता.

श्रीकृष्ण आपल्यामधील सोळा उपचक्रांचे नियंत्रण करतात. आपले गळा, कान, नाक, डोळे यांच्यावरही त्यांचेच नियंत्रण असते. ते प्रत्यक्ष विराटच आहेत, फक्त अर्जुनालाच त्यांनी हे विराट रूप दाखवले, त्या रूपातच सर्व सृष्टीचा आदि आणि अंत आहे हे अर्जुनाला दाखवले. सहजयोगी सदैव समाधानी असतात. या आडवळणाच्या ठिकाणीही तुम्ही एकत्र आरामात व आनंदात राहू शकता; ही सामूहिकतेमध्ये आनंद उपभोगण्याची कला श्रीकृष्णांनीच शिकवली आहे. लोकांपासून दूर राहणारा माणूस श्रीकृष्णांचा उपासक असूच शकत नाही. श्रीकृष्णांशी समरस झालेला योगी सगळ्यांमधे, विशेषतः सहजयोग्यांबरोबर आनंदात असतो. तुमच्यामध्ये एकमेकांबद्दल आदर व प्रेम राखून वागण्याचीच भावना असते. कुणाला फसविण्याचा, दुखवण्याचा विचारही तुमच्या मनांत येत नाही. सत्य समजल्यावरच तुम्हाला

**ध्यान करीत नसाल तर तुम्हाला जबरदस्ती करणार नाही;**
**पण मला तुमच्याशीही काही कर्तव्य नाही. तुमचे बाह्यातील इतर नाते असेल;**
**पण हे आंतरिक नाते, ज्यामुळे तुमचे हित साधते, ते ध्यानाशिवाय प्राप्त होणार नाही.**

असे प्रेमाने सामूहिकतेत रहाता येते ही एक आश्चर्यकारक घटना आहे.

अमेरिका श्रीकृष्णांची भूमि आहेच आणि अमेरिकासुद्धा सामूहिकतेबद्दल जागरुक असते. पण इथें ही सामूहिकता वेगळ्या अर्थाने दिसून येते; म्हणजे अमेरिका जगभरातील अनेक देशांमध्ये रस घेते, सगळीकडे आपले हातपाय पसरण्याचे डाव खेळते आणि त्याच्या मागें कसलाही चांगला उद्देश नसतो तर उलट स्वार्थ असतो. तसे नसते तर मादक द्रव्यांचे उत्पादन करणारे देश नष्ट करणे त्यांना अशक्य आहे का? म्हणूनच मी म्हणते की त्यांची सामूहिकता चुकीच्या मार्गाने कार्य करत आहे. याला कारण विवेकशक्तीचा अभाव; विवेक जागृत नसेल तर सामूहिकतेचा सदुपयोग होत नाही; म्हणून इतर देशांबद्दलचे त्यांचे निर्णय चुकीचे ठरतात.

विशुद्धि चक्राबद्दल खूप कांहीं सांगण्यासारखे आहे. पण त्याच्या दोन्ही बाजूंच्या खांद्यावरील श्रीचक्र आणि ललिताचक्र या दोन चक्रांची मला जास्त काळजी वाटते.म्हणून महिलांना ही चक्रे उघडी पडणार नाहींत असा पोषाख करण्याबद्दल मी नेहमी सांगत असते; हे फार महत्त्वाचे आहे व महिलांनी ही काळजी घेणें अत्यंत आवश्यक आहे. या चक्रांमधे श्रीकृष्णांची स्त्री-शक्ति आहे म्हणून त्यांचा आदर आपल्या वेषभूषेमध्ये राखणे त्यांच्या हिताचे आहे व तिकडे दुर्लक्ष झाल्यास त्यांनाच त्रास होणार आहे. श्रीगणेशांचा आदर राखला नाहीं की आपल्यालाच त्रास होतो. आपल्या चक्रांवर बाहेरून होणाऱ्या प्रभावांचे दुष्परिणाम आपल्या शरीरावर होतात हे तुम्ही लक्षांत ठेवले पाहिजे; त्यामुळे आपल्या वागण्यावरही परिणाम होतो. त्याचप्रमाणे आपल्या दृष्टीबद्दलही काळजी घेतली पाहिजे, आपली नजर शुद्ध असावी, भरकटणारी नसावी. ह्या सर्व गोष्टींची काळजी घेतली नाहीं तर आपण धर्मापासून, आपल्या उत्क्रान्तीच्या ध्येयापासून दूर जातो. याचा प्रमाणाबाहेर अतिरेक झाला तर अंधत्त्व येऊं शकते. तीच गोष्ट आपल्या जिभेची; कारण नसतांना उगीचच कडवट भाषा वापरणे, अपशब्द बोलणे, दुसऱ्याला बोलण्यामधून दुखवणे, स्वार्थ साधण्यासाठी वरवर गोड बोलणे. इ. चा अतिरेक झाला की कदाचित् एक दिवस ही जीभ काम करेनाशी होईल, जड होईल, जिभेवर फोड येतील. म्हणून जिभेचा उपयोग करतांना काळजी घेतली पाहिजे. याचा अर्थ असा नाहीं की दुसरा वाट्टेल तसे बोलू लागला तरी गप्प बसून सहन करायचे; तसे केल्याने डाव्या बाजूचे त्रास चालू होतात. कुणी शिव्या देऊं लागला तर शांत बसून त्याच्याकडे फक्त रोखून, तो मूर्ख आहे असे समजून पहात रहा; पण स्वतःला दोष देत बसू नका. गळ्याच्या बाबतीतही ही काळजी घेतली पाहिजे; उगीच आरडाओरड करणे, खेकसून बोलणे इ. मुळे गळा सुजण्याची, गुदमरून जाण्याची भीति असते. हे सर्व विवेक राखून करा कारण ही श्रीकृष्णाची लीला आहे आणि त्यामधून ते तुमची परीक्षा घेत असतात. हे सविस्तर सांगण्याचा उद्देश एवढाच की सहजयोग्यांनी संयम व विवेक सांभाळून संतुलनात राहिले पाहिजे; आक्रमकपणा किंवा नेभळटपणा या दोन्ही प्रवृत्ति टाळून खंबीरपणे वावरले पाहिजे. विशुद्धि चक्राबद्दलचे सूक्ष्म ज्ञान मिळवताना या स्थूल गोष्टींचीही काळजी घेतली पाहिजे; विशुद्धि चक्राची शक्ति बळकट व कार्यान्वित करण्यासाठी त्याची अत्यंत जरूरी आहे.

अमेरिका सर्व विश्वाची विशुद्धि आहे. म्हणून इथल्या ज्येष्ठ योग्यांना विशुद्धि चक्राची व त्यांतील शक्तीची पूर्ण माहिती असणें आवश्यक आहे; आणि या चक्राची त्यांनी खूप काळजी घेतली पाहिजे; म्हणजे ही शक्ति जगभर पसरेल. तुमचे दोन्ही हातही विशुद्धि चक्रच सांभाळते म्हणून सहजयोगाच्या प्रचारासाठी त्यांचा उपयोग करा; खेड्यांपाड्यांपासून बाहेरच्या देशांपर्यंत सहजयोग पोचवण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. तुमच्या हातांवर थंड चैतन्य लहरींची जी जाणीव येत आहे ती विश्वव्यापी परमेश्वरी शक्तीच तुमच्या चेतनेमधें उतरल्याची खूण आहे. तीच तुम्हाला मार्गदर्शन करणार आहे. त्या कार्यामधें विशुद्धि चक्राचे आणि म्हणून अमेरिकेचे फार महत्त्व आहे. अमेरिकेचे सुजाण नागरिक म्हणून नीतीचे व धर्माचे वातावरण इथें तयार करा; जागतिक समस्यांचे नीट आकलन होण्यासाठी प्रयत्न करा आणि जगभरातून आलेल्या सर्व मानवांबरोबर प्रेमपूर्वक व्यवहार करा.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

**ध्यान करणाऱ्या व्यक्तीची वेगळीच प्रकृति असते, वेगळा स्वभाव असतो, वेगळेच जीवन असते आणि तो सतत समाधानी असतो. असे जर तुमच्या बाबतीत घडले असेल तर ते तुम्हाला सहाय्यभूत होईल आणि तो तुम्हाला मोठा आशीर्वाद असेल.**

# अमेरिका येथील २००१ विवाह-सोहळा

प. पू. श्रीमाताजींनी उपवधूंना केलेला उपदेश
कान्हाजोहरी
दि. ३० जुलै २००१

तुम्ही इतक्या नवपरिणित वधूंना इथें पाहून मला फार आनंद होत आहे. वैवाहिक जीवनांत पदार्पण करणाऱ्या व भावी सुखी आयुष्याबद्दल उत्सुक व प्रसन्न असणाऱ्या वधूंच्या जीवनामधील ही एक मोठी घटना आहे. मला प्रथम सांगावेसे वाटते की विवाह सफल वा असफल होणे पूर्णपणे पत्नीवर निर्धारित आहे. प्रत्येक प्रसंगी जबाबदारीने व समजूतदारपणाने वागणे हे तिचे कर्तव्य आहे. कारण हा मुख्यतः प्रेमाचा व्यवहार आहे. हृदयात प्रेम जागृत असले की सर्व व्यवस्थित होते. म्हणून लक्षांत ठेवायची मुख्य गोष्ट म्हणजे पतीबरोबर किंवा सासरच्या मंडळींबरोबर वागताना तुमच्यामधील ही प्रेम-भावना दिसून आली पाहिजे व ते नाराज होणार नाहीत असे तुमचे वागणे असले पाहिजे.

कधीं कधीं तुमच्या मनाविरुद्ध कांही घडले तर अस्वस्थ न होता नंतर शांतपणे तुमचे मत मांडा; तुम्ही पतीवर खरोखरच प्रेम करता, त्याची काळजी घेता हें तुमच्या बोलण्या-वागण्यांतून कसे व्यक्त होते याला महत्त्व असते. बऱ्याच जणींना हे नीट उमगत नाही; त्यांना वाटते की पत्नी म्हणून कांहीं मागण्याचा त्यांनाही अधिकार आहे. खरं तर तुमचे कांहीही मागणे नसावे; तुमच्यामधील प्रेमभावना वातावरणांत पसरली की हे प्रेमच तुमच्या सर्व आकांक्षा पुऱ्या करणार आहे. तोंड उघडून कांही मागण्याची वेळच तुमच्यावर येणार नाही; कारण तुमच्या वागण्यामधील हे प्रेमच तुम्हाला काय हवे-नको याची पूर्तता करेल. स्वतःहून कांहीं मागायचे नाही हा मंत्र विसरू नका. मग नवऱ्यालाच वाटेल की ही आपल्याकडून कांहीच मागत नाही. तसेच तुमचे वागणे असावे.

तुम्हाला तुमच्या पतीचा आत्मसन्मान व आत्मविश्वास बळकट करायचा आहे. मुलाचे सर्व कांही करणारी आईच असते कारण ते आईवरच पूर्णपणे अवलंबून असते. पण तुम्ही तुमच्या पतीच्या पाठीमागील शक्ति आहांत; तुमच्या प्रेम व आपुलकीनेच त्याचे जीवन परिपूर्ण होणार आहे. हे एकदा मनाशी पक्के बांधलेत की छोट्या-मोठ्या गोष्टींचा तुम्ही उगीच बाऊ करणार नाही. उदा. तो काय करतो, कसले कपडे घालतो वगैरे. तो तुमच्यापेक्षा वेगळ्या कुटुंबात, वेगळ्या वातावरणात वाढलेला असल्यामुळे तसल्या सवयींबद्दल कुरकुरत बसू नका. तुम्हा दोघांच्या वेगवेगळ्या जीवनप्रणालींमध्ये कांही फरक राहणारच. म्हणून स्वतःच्या आवडी व मते त्याच्यावर लादण्याच्या आग्रहांत पडू नका. त्याचे कुठें कांही विशेष चुकत असेल तर सावकाश, त्याचा मूड सांभाळून नंतर सांगा व नीट बोलून समजवा. त्यांत कसला कमीपणा वाटून घेऊं नका; उलट असे वागल्याने तोच तुमचा अंकित होईल, आणि तुमच्या मनासारखे वागेल.

तुमचा हा सहज-विवाह आहे, इतर विवाहांसारखा नाही; सहजविवाह हा साक्षात्कारी मुला-मुलींचा विवाह असतो. दोघांनी आत्म्याला जाणले असल्यामुळे तुमचे जीवन प्रेम, शांति, आनंद आणि परमेश्वरी आशीर्वाद यांनी समृद्ध करणारा हा संबंध आहे, ते तसे होणे हे तुमच्या हातात आहे हे विसरू नका.

तुम्हां दोघांत कांहीं फरक किंवा आवडी-निवडींमध्ये अंतर असेल तरी असल्या गोष्टी मनावर न घेता तिकडे दुर्लक्ष करा; पण त्याच्या मर्जीप्रमाणे कांही गोष्टी कराव्या लागल्या तर जरूर करा; त्यांतून दोघांनाही समाधान व आनंद मिळेल. कांहींच्या बाबतीत हे अशक्यच ठरले तर सहजयोगांत घटस्फोटाला परवानगी नाकारली जात नाही.

मला स्वतःला वाटते की एक सुंदर घरकुल, प्रसन्न घरकुटुंब व सुंदर मुले निर्माण करणे ही पत्नीची सर्वांत मुख्य जबाबदारी आहे. तुमची मुले जन्मतःच साक्षात्कारी निपजणार असल्यामुळे ती चांगले सहजयोगी होणार आहेत व त्यांच्याकडून फार मोठे कार्य होऊ शकेल. अशी बरीच चांगली मुले पाहिल्यावर मला फार कौतुक वाटते. हे सर्व आतां तुमच्यावर विसंबून आहे आणि ते कसे करायचे, कसे जोपासायचे याचा निर्णयही तुम्हालाच करायचा आहे. कांही महिलांना वाटते की, त्यांना घरांतील फार काम पडते व श्रम होतात म्हणून त्यांना विश्रांतीची जरूर आहे, त्यासाठीं त्यांना घराबाहेर पडण्याची मोकळीक हवी असते. तर पुरुषांना वाटते की संसार चालवण्यांत त्यांनाच जास्त कष्ट उपसावे लागतात. इथें लक्षांत घ्यायची गोष्ट आपण नेहमी स्वतःचा विचार न करतां दुसऱ्याचा विचार करावा; प्रामाणिकपणे व हृदयापासून असा विचार केला की आपण दुसऱ्याला बरोबर समजूं शकतो. तीच गोष्ट मी उपवर मुलांनाही सांगितली आहे.

ह्या सर्व गोष्टी पति-पत्नी दोघांनीही नीट समजून घेतल्यास सहज-विवाह खूप यशस्वी होतील; त्यांतून सर्वांनाच आनंद, सुख-समाधान व नीतीमत्ता मिळेल. नीतिमत्ता ही वैवाहिक जीवनातील फार काळजीपूर्वक सांभाळण्याची गोष्ट आहे, तिथे पाय घसरला तर तो डाग निघणे फार अवघड आहे आणि मीही त्यांत कांहींही करूं शकत नाही. तुम्हाला जर या विवाहसंबंधात कांहीं खटकत असेल तर तुम्ही अजूनही तुमचा निर्णय बदलूं शकता; हे वैवाहिक बंधन तुम्हीच यशस्वी करून दाखवायचे आहे. सुखी व प्रेमळ कुटुंबामुळे सर्वांनाच आनंद मिळतो; तसे झाले नाही तर इतर लोकही कुजबूज करूं लागतात व तुम्हांलाच टाळतात. म्हणून तसे कांहीं न होता तुम्हीही आनंद मिळवा आणि इतरांनाही तो वाटा. मी तुम्हा सर्वांना खूप-खूप सुखी व समाधानी वैवाहिक जीवन मिळावे अशी प्रार्थना करते.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

# महाराष्ट्र सहजयोग सेमिनार २००१
## इचलकरंजी


सन २००१ मधील महाराष्ट्र सहजयोग सेमिनार इचलकरंजी-मध्ये राजीव गांधी सांस्कृतिक भवनाच्या प्रांगणात नुकताच दि. ७-८-९ या तारखेला सप्टेंबरमध्ये पार पडला. सेमिनारमध्ये महाराष्ट्रातील बहुतेक सर्व ठिकाणांहून सुमारे दोन हजार सहयोगी बंधु-भगिनी उपस्थित होते. सेमिनारचे सर्व आयोजन व व्यवस्था इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, जयसिंगपूर इत्यादि परिसरातील सर्व सहजयोग्यांनी व युवाशक्तीने परिश्रमपूर्वक व आत्मीयतेने केले होते. उपस्थितांची राहण्याची व जाण्यायेण्याची व्यवस्था, भव्य सभामंडप, व्यासपीठ व सजावट, भोजनव्यवस्था, सेमिनारच्या सर्व कार्यक्रमांची आखणी व नियोजन, सहज-क्रांति हे सेमिनारचे घोषवाक्य इत्यादीमधून उपस्थितांना त्याचे दर्शन घडून समाधान व आनंद मिळाला.

सेमिनारची सुरुवात शुक्रवार दि. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता प. पू. श्रीमाताजींच्या कमलचरणांवर अर्पण केल्या गेलेल्या श्रीगणेश-पूजनाने झाली. सर्व पूजाविधि साग्रसंगीत प्रकारे व स्थानिक कलाकारांच्या भजनांच्या साथीबरोबर व्यवस्थित पार पडला व उपस्थितांना श्रीमाताजींच्या निराकार स्वरूपातील चैतन्याची जाणीव व अनुभूति मिळाली. पूजेनंतर झालेल्या हवनामधून सर्व योग्यांना स्वतःसाठी व वातावरणासाठी शुद्धताही प्राप्त झाली. त्यापाठोपाठ सेमिनारचे औपचारिक उद्घाटन श्री. मगदूमसाहेबांकडून विधियुक्त दीपप्रज्वलाने करण्यात आले. आपल्या उद्घाटनप्रसंगीच्या मार्गदर्शक भाषणामध्ये दीपप्रज्वलनातील तेजशक्तीचा संदर्भ स्पष्ट करून त्यांनी उपस्थितांना सहजयोगातून अध्यात्मिक उन्नतीबद्दल सतत व अधिकाधिक अग्रेसर बनणे, ध्यान व समर्पणाबद्दल जागरूक व प्रयत्नशील राहणे, श्रीमाताजींकडून मिळालेल्या अतुलनीय शक्तीद्वारे स्वतःला खऱ्या अर्थाने ज्ञानी बनविणे व सहजयोगाच्या प्रचार व प्रसार कार्यासाठी तळमळीने अखंडपणे झटणे इत्यादीबद्दलच्या प्रत्येक सहजयोग्याच्या जबाबदारीसंबंधी परखड शब्दांतून मार्गदर्शन केले. यानंतरच्या महाप्रसादाच्या भोजनानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रम झाला. त्यामध्ये स्थानिक व परगांवाहून आलेल्या सहजी कलाकारांनी आपआपल्या कला सादर केल्या. त्यात भजन, बालगोपाळांचे समूह नृत्य व भजने, भरतनाट्यम्, कवाली व ठेक्यातील उपस्थितांची दाद मिळवणारी भजने, सतार-व्हायोलिन जुगलबंदी इ. मनोरंजक कार्यक्रम होते. त्यातील एका उल्लेखनीय कार्यक्रमात धरमशाळेमधील पाच-सहा वर्षांच्या पाश्चिमात्य मुलींनी सादर केलेल्या मराठी भजनांचे सर्वांना कौतुक वाटले.




सेमिनारच्या दुसऱ्या दिवसाची शनिवार दि. ८ सप्टेंबरच्या सत्राची सुरुवात खास सेमिनारसाठी दिल्लीहून आलेले श्री. अरुण गोयल यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. आपल्या सुमारे दीड तासाच्या भाषणामध्ये त्यांनी सहजयोगाच्या समस्त पैलूंचा आढावा घेतला. भारतात व विशेषतः महाराष्ट्रात जन्म प्राप्त झालेल्या सहजयोग्यांचे महाभाग्य, विश्वकुंडलिनी व सप्तचक्रांची शक्ती-रचना, विश्वाचे सहस्रार उघडण्यासाठी आदिशक्तीचे श्रीमाताजी स्वरूपातील पृथ्वीमातेवरील अवतरण या सर्व अलौकिक घटना स्पष्ट करत त्यांनी सर्व मानवजातीला आत्मसाक्षात्कार उपलब्ध करून देण्याबद्दलची प्रत्येक सहजयोग्याची जबाबदारी व पवित्र कर्तव्य असल्याची जाणीव उपस्थितांनी ठेवण्यावर भर दिला. या संदर्भात विद्युतशक्तीच्या वितरणाचे जाळे सर्वदूर पसरवल्याशिवाय मोठमोठी विद्युत्-जनक यंत्रणा फुकट असल्याचे समर्पक उदाहरण त्यांनी दिले. त्यासाठीच भौतिक वा कौटुंबिक समस्या, आजार व रोगनिवारण, सहजामधील ट्रीटमेंट्स इत्यादी सीमित गोष्टींमध्येच अडकून न राहता नम्रपूर्वक जाणिवेच्या उच्च स्तरावर येण्याचा व आपल्याला मिळालेला दिव्य प्रकाश अधिकाधिक प्रखर बनवून बाहेर पसरवण्याचा ध्यास सहजयोग्यांनी घेण्यावरच सेमिनरांचे यश अवलंबून







असते इकडे उपस्थितांचे त्यांनी लक्ष वेधले. त्याचबरोबर 'सर्व धर्मान् परित्यज्य मामेऽकम् शरणं' या भावनेने श्रीमाताजींच्या चरणी समर्पित होण्याची भूमिका त्यांनी विशद केली.

त्याच दिवशीच्या दुपारच्या सत्रामध्ये दिल्लीमधील निर्मलनगरीच्या उद्घाटन सोहळ्याची व्हिडिओ कॅसेट व इटलीमधील डॉक्टरांनी Vega Machine वर मानवाच्या शरीरामधील उर्जेसंबंधी सहजयोगामधून केलेल्या संशोधनाची कॅसेट दाखवण्यात आली. तसेच परमचैतन्याच्या अनेक प्रसंगी वेगवेळ्या ठिकाणी घटित झालेल्या चमत्कारांची नोंद करण्यात आलेली व रोगनिवारणासंबंधीची सीडी व्हिडिओ कॅसेट दाखवण्यात आली. त्यानंतर उपस्थितांकडून मागविण्यात आलेल्या सर्व प्रश्नांचे व शंकांचे श्री. अरुण गोयल यांनी निरसन केले. सायंकाळच्या सत्रामध्ये संगीत-रजनीचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये संगीत, भजन, नृत्य, समूह नृत्यगान इत्यादी कार्यक्रमांत अनेक ठिकाणांहून आलेल्या व स्थानिक कलाकारांनी भाग घेतला व परमचैतन्याची वृद्धि करण्यास हातभार लावला. या संगीत-रजनी कार्यक्रमाचा समारोप श्री. अरुण आपटे यांनी सादर केलेल्या भजनांनी व रागदारीमधून गायिलेल्या प्रत्येक चक्राच्या मंत्र-गायनाने झाला व श्रोते चैतन्यमय झाले. तेव्हा मध्यरात्रीचे तीन वाजून गेले होते.

रविवार दि. ९ सप्टेंबर या तिसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या सहज-बंधूभगिनींनी सहजयोगासंबंधीच्या अलग-अलग संदर्भातील आपले विचार व अनुभव मांडले. सकाळच्या सेमिनारच्या अखेरच्या सत्राचा समारोप सांगलीचे श्री. कुंभोजकर यांनी सेमिनारला दिलेल्या 'सहज-क्रांति' या घोषवाक्याची संकल्पना विशद करुन केला. श्रीमाताजींचे सहजयोग जगभर पसरविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी स्वातंत्र्ययुद्धात जसा क्रांतीचा जयजयकार भारतभर दुमदुमत होता त्याप्रमाणे सहजयोगाच्या प्रचार-प्रसार कार्यासाठी सहजयोग्यांनी क्रांतिकारक बनण्याची वेळ आली आहे हा संदेश 'सहज-क्रांति' या घोषवाक्यामधून देण्याचा उद्देश होता. या संकल्पनेला सांकेतिक रूप देण्यासाठी व्यासपीठावर एक मशाल श्री. मगदूमसाहेबांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली व पारंपरिक लढाऊ मावळ्यांचा वेष परिधान केलेल्या पाच-सहा युवकांनी आपापल्या हातातील मशालीही पेटविल्या आणि नाचत-नाचत त्या मशाली उंचावत भवानीमातेचा जोगवा गात नाच केला. ही संकल्पना व त्याचे स्पष्टीकरण पाहून सर्व उपस्थित योगी भारावून गेले.

अशा तऱ्हेने तीन दिवस चाललेला हा महाराष्ट्र सेमिनार उत्साहपूर्ण, आनंद व चैतन्यमय वातावरणात पार पडला. इचलकरंजी व परिसरातील सहजयोगी बंधू-भगिनींचे सेमिनार नियोजनपूर्वक व यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!

●●●

# अमृतवाणी

प. पू. श्रीमाताजींची प्रवचने व पूजाप्रसंगीची भाषणे म्हणजे अमृतधाराच असतात. त्यांचे जितके पारायण करावे तितका त्यांतील सूक्ष्म आशय ध्यानात येतो. या अनेक प्रवचनांतील अर्थगर्भ अवतरणे ''अमृतवाणी'' सदरांत उर्धृत केली जातात.

... आत्मा ही तुमच्याजवळ असलेली अत्यंत मौल्यवान वस्तु आहे; त्याची किंमत करणे अशक्यप्राय आहे; म्हणूनच ती चिरंतन मोलाची आहे.

... सत्, चित् आणि आनंद परमात्म्यामध्ये एकवटलेले आहेत. तिथे पूर्ण शांति आहे. काही निर्मिती वा आविष्कार नाही. चित् आनंदाने व्यापून गेले असल्यामुळे आनंद हा परमसत्यरूप असतो.

... परमात्म्याला भेटण्याइतकी दुसरी कुठलीही शुद्ध इच्छा नाही. ही शुद्ध इच्छा मात निर्माण करण्याचा प्रयत्न करत राहा. त्यासाठी आपली आई कशामुळे प्रसन्न होईल याचा सतत ध्यास बाळगा.

... आत्म्याचे स्थान तुमच्या हृदयात आहे. त्याचा प्रकाश मेंदूमध्ये पडला की, मेंदूला अमर्याद शक्ती प्राप्त होते. आजपर्यंत निर्जीव वस्तु तयार करणारा मानवी मेंदू कुंडलिनीचे जिवंत कार्य करण्यास सक्षम होतो आणि तुमचा आत्मसाक्षात्कार परिपूर्ण अवस्थेला येतो.

... गुरुत्वाकर्षण शक्तीच्या उलट दिशेने वर होऊ शकणारी एकच शक्ती आहे आणि ती म्हणजे कुंडलिनी. तिच्या उत्थानाची माणसाला जेव्हा इच्छा नसते तेव्हाच ती गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाखाली येते.

... संपूर्ण शरणागत झाल्याशिवाय ध्यानाला गहनता येत नाही.

... आनंदाच्या अनुभूतीमध्ये विचार नसतात. म्हणून आनंद ही प्रत्यक्षच अनुभवण्यासारखी वस्तु आहे. निर्विचारता फक्त ध्यानामधूनच मिळते.

... डोळस भक्तीमध्ये श्रद्धा असतेच; पण त्याचबरोबर भक्ताला शक्ती पण प्राप्त होते. निव्वळ श्रद्धेपासून तशी शक्ती मिळत नाही.

... आत्मसाक्षात्कार झाल्यावर देह, मन व बुद्धि एकमेकांत समरस होतात,

... आत्म्याला जाणणे यातच सारी सूज्ञता असते.

... तुम्हाला प्रकाश हा दुसऱ्यांना देण्यासाठी मिळाला आहे ही तुम्ही समजून घेण्यासारखी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे; म्हणून पुढे या.

... व्हायब्रेशन्स म्हणजे दुसरे काही नसून ईश्वरी प्रेमच आहे.

# सहज-समाचार

## २६ जानेवारीच्या भूज भूकंपाविषयी

सहजयोग हा महायोग आहे याची अनुभूती घेतलेले सहजयोगी भारतभर पसरले आहेत. सर्व प्रांतात बहुसंख्येने आहेत; पण गुजरातमध्ये सहजयोगी नाममात्र आहेत. गुजरातमध्ये सहजयोगाची जी केंद्रे आहेत ती फक्त महाराष्ट्राला लागून, जसे वापी, बलसाड, नवसारी, बडोदा, अहमदाबाद व बनारस काठावरील पालनपूर येथेच. २६ जानेवारीच्या भूकंपाने जवळ-जवळ सर्व भारत हादरला; पण तडाखा बसला तो गुजरातला व अहमदाबादला. दाणादाण उडाली. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे गुजरातमध्ये एवढी उलथापालथ झाली; पण कोठेही सहजयोग्यांची जीवित व वित्तहानी झाली नाही. गुजरातला पंचमहाभूतांचा तडाखा वारंवार बसतो. कधी भयानक वादळरूपाने, कधी प्रलंयकारी महापुराने व आता भूकंपाने. या पंचमहाभूतांवर मात करून, त्यातून मार्ग काढून पुढे जाण्याकरिता सहजयोगाशिवाय दुसरे कुठलेही साधन नाही. सहजयोगात अशक्य व असाध्य असे काहीही नाही.

पाण्याच्या झऱ्याप्रमाणे आपला हा सहजयोगीरूपी झरा सतत खळखळत वाहत राहिला पाहिजे. यासाठी आपण सर्व सहजयोग्यांनी मनापासून, एकाग्रतेने व गहनतेने मानवतेच्या कल्याणासाठी व उद्धारासाठी सहजयोगाच्या प्रचाराचे कार्य जोमाने केले पाहिजे. भूतकाळामध्ये एवढे तडाखे बसूनसुद्धा गुजरातमध्ये जे काही अल्प सहजयोगी आहेत त्याचे काहीही आणि कधीही नुकसान झाले नाही.

मी स्वतः व्यावसायिक इंजिनियर आहे. सिव्हिल इंजिनियरिंगचा पदवीधर आहे व स्ट्रक्चरल डिझाईन करण्याचा मुख्य व्यवसाय आहे. मुंबई परिसर व महाराष्ट्र कार्यक्षेत्र आहे, तसेच गुजरातमध्येही बरीच कामे झाली आहेत. जसे वापी, सिल्व्हासा, बडोदा, वेरावळ, उणा सिमर, राजकोट व कच्छमध्येसुद्धा विविध प्रकारची निवासी व वाणिज्य संकुले, तसेच औद्योगिक कारखान्यांची कामे केली आहेत. राजकोटमध्ये चार ते सहा मजल्यांच्या अनेक इमारती, तसेच आठ ते नऊ मजल्यांच्या चार इमारती केल्या आहेत. राजकोटमध्येच सिरॅमिक टाइल्सचा प्रचंड मोठा औद्योगिक कारखाना केला आहे. तसे पाहिल्यास भूजपासून राजकोट व अहमदाबादचे केंद्रबिंदूपासूनचे अंतर एकसारखेच आहे. राजकोटलाही बरेच नुकसान झाले; पण मी केलेल्या इमारतीस कुठल्याही प्रकारची हानी झाली नाही. भूजपासून २५ किलोमीटरवर मोटा येथे दोन इमारती, ३५ किलोमीटरवर बिदडा येथे दोन इमारती व लायना येथे तीन इमारती केल्या आहेत; पण आश्चर्य म्हणजे कोणत्याही इमारतीस जीवित व वित्त हानी झाली नाही. बच्छाव गाव संपूर्ण उद्ध्वस्त झाले व त्या गावापासून १५ किलोमीटरवर १२ वर्षांपूर्वी एक इमारत केली हो ती, ही इमारत आजही उभी आहे. आर. सी. सी. फ्रेम लवचिक असते; पण बांधकाम रिजिड असते. म्हणून इतक्या तीव्र धक्क्याने फक्त दोन-तीन इमारतींना तडे गेले, थोडी वित्तहानी झाली; पण इमारत दुरुस्त करण्यासाखी आहे. हे सर्व कार्य माझ्या हातून झाले ते केवळ परमपूज्य आदिशक्ती

श्रीमाताजींच्या कृपाशिर्वादातच.

जेव्हा एखादे काम आपण करतो तेव्हा त्या कामाविषयी आपल्याला प्रेम उत्पन्न होते व त्या कामाशी प्रेमाचे नाते निर्माण होते. तेव्हा गुजरातमधील कामाशी माझे अतूट नाते निर्माण झाले व अजूनही ते अतूट नाते कायम आहे. मी एक सहजयोगी असल्याने सहजयोग मला एक कल्पतरु म्हणून भावला; पण याच सहजयोगरूपी कल्पतरूची छाया जर सर्व मानवजातीला लाभली तर याचा आनंद इतका द्विगुणीत होईल की, तो शब्दात व्यक्त करण्यासारखा नाही. त्याच्या अनुभूतीतूनच तो आनंद द्विगुणीत होणार आहे.

म्हणूनच एखादी नैसर्गिक आपत्ती होऊनसुद्धा आदिशक्ती परमपूज्य श्रीमाताजींच्या कृपेत मी केलेली संबंधित बांधकामे वाचली. आदिशक्ती परमपूज्य श्रीमाताजीप्रणित सहजयोग म्हणजे मानवजातीला लाभलेले एक वरदान आहे. या वरदानाचा लाभ आपल्याला मिळाला आहे, तो इतरांना पण दिला पाहिजे. म्हणून निरनिराळ्या क्षेत्रातील व्यावसायिकांना, तंत्रज्ञांना सहजयोग समजावून सहजयोगात आणल्यास मानवजातीचे कल्याण होईल व अशा आपत्तींवर मात करता येईल.

●●●



२५ ऑगस्ट २००१ गणेशोत्सवामध्ये कानकास्ट प्रा. लि. चिंचवड पुणे गणपतीसमोर पब्लिक प्रोग्रॅम झाला



१९ ऑगस्ट २००१ जुन्नर सेंटर हळदी-कुंकू निमित्त जागृतीचा कार्यक्रम



१५ ऑगस्ट २००१ रोजी विद्याकुंज विद्यालय वारजे पब्लिक प्रोग्रॅम

सहज सहज सब कोइ कहै,
सहज न चीन्हे कोय।
जो सहजै साहेब मिलै,
सहज कहावै सोय॥

– संत कबीर

देही असोनिया देव। वृथा फिरतो निर्दैव
देह आहे अंतर्यामी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी
नाभी मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरी
साखरेचे मूळ ऊस। तैसा देहि देव दिसे
दुधीं असत्या नवनी। नेणे त्याचे मथित
तुका सांगे मूढ जना। देही देव का पाहाना

– संत तुकाराम

## गणेश पूजा, प्रतिष्ठान पुणे



दरवर्षी प्रमाणे यंदा गणपतीत प्रतिष्ठानवरील प्रसिद्ध संगमरवरी गणेशाची महापूजा सकाळी १० ते दु. १ च्या सुमारास झाली. पुजेमध्ये पुण्याच्या संगीत गुपने व श्री. अरूण आपटे यांनी अनेक भजने सादर केली.

## आफ्रिकेतून सहजवार्ता

आफ्रिकेच्या पश्चिम भागात आयव्हरी कोस्ट (Ivory Coast) या प्रदेशामध्ये १९९२ साली सहजयोग सुरू झाला व आता तिथे ३००० सहजयोगी आहेत. राष्ट्रीय मुख्य केंद्र अबिदजान या शहरात आहे. अनेक इतर ठिकाणी उपकेंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रावर साप्ताहिक सामूहिक ध्यान होते तसेच भजन, पूजा, सहजयोगाचा प्रचार इ. कार्यक्रम उत्साहात होतात. श्रीकृष्ण पूजेच्या आदल्या दिवशी श्रीकृष्णांचे जीवन चरित्र व कार्य सर्वांना समजावून सांगण्यासाठी एक सेमिनारही आयोजित केला गेला. त्याचप्रमाणे २९ जुलै ते ४ ऑगस्ट या दिवसांत श्रीरामांचे जीवित कार्य व गुणमहात्म्य सविस्तरपणे समजावून सांगण्यासाठी एक विशेष कार्यशाळा आयोजित केली होती.

## प. पू. श्रीमाताजींचा अमेरिकेतील एक कार्यक्रम

अलिकडेच श्रीमाताजी अमेरिकेला गेल्या असताना ४ ऑगस्टला वॉशिंग्टन इथे त्यांच्या उपस्थितीत एक पब्लिक प्रोग्राम झाला. विशेष म्हणजे प्रोग्रामचे स्थान व्हाइट हाऊसच्या परिसरातच अब्राहम लिंकन स्मारकाजवळच होते. ब्राझीलमधून आलेल्या काही सहजयोग्यांनी कार्यक्रमाची जी पत्रके वाटली त्यांवर श्रीमाताजींचा एक परमचैतन्याचा चमत्कार दाखवणारा फोटो होता व त्याचे खाली "The world Saviour- Come and Discover the Desting of Humanity" असे शब्द होते. तिथे अशा कार्यक्रमांची पोस्टर वा फलक लावण्यास बंदी असल्यामुळे रस्त्यावर वा स्टेशनवर लोकांच्या हातातच पत्रिका द्यावा लागतात. एकेक सहजयोग्याने १५-२०,००० पत्रके वाटली. प्रोग्राममधील भाषणात श्रीमाताजींनी अब्राहम लिंकनच्या लोकोत्तर गुणांचे खूप कौतुक केले. सर्व कार्यक्रम उघड्या हिरवळीवरच झाला. अनेक लोकांनी चैतन्य जाणवल्याचे हात उंच करून दाखवले.

## वृत्तपत्र माध्यमातून सहजयोग

प. पू. श्री. माताजींच्या कृपेत कोल्हापूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक पुढारीच्या अंकात दर रविवारी 'बहार पुरवणीमध्ये' ''परिचय सहजयोगाचा' हे शशिकांत कुंभोजकर केंद्र प्रमुख, सांगली यांनी प. पू. श्री. माताजींच्या कृपेत लिहिलेले सदरगेल्या जुलै २००० पासून प्रसिद्ध होत आहे. त्याचे आतापर्यंत २९ भाग प्रसिद्ध झाले आहेत. हे सदर प्रसिद्ध होण्यासाठी सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी येथील सहजयोगी बंधू भगिनींनी मोलाची मदत केली आहे. या सदराला भरपूर प्रतिसाद मिळत आहे. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा.

## अहमदनगर जिल्ह्यातील प्रोग्रॅम्स

(१) मनोली (ता. संगमनेर जि. अहमदनगर) येथे जुलै महिन्यात सामुहिक ध्यान व कुंडलिनी जागृतीचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास जवळजवळ १५० शेतकरी बंधू-भगिनींनी जागृति घेतली. त्यानंतर दोन दिवस फॉलोअप झाला. आता तेथे दर रविवारी सेंटर घेतले जाते.

(२) टाकळीभान (ता. श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर) येथे दि. १७ जून रोजी सहजयोग ध्यान केंद्राचे उद्घाटन केले. सर्वांत प्रथम श्री. माताजींच्या प्रतिमेसह मोठी मिरवणूक काढण्यात आली. जवळजवळ १५०० लोकांनी जागृती घेतली दुसऱ्या दिवशी फॉलोअपला २५० लोक उपस्थित होते. सदर कार्यक्रमांचे आयोजन श्रीरामपूरच्या सहजयोग्यांनी केले होते.

(३) दि. २८ जुलै रोजी आदर्श गाव– राळेगण सिद्धी (ता. पारनेर. जि. अहमदनगर) या ठिकाणी सामुहिक कुंडलिनी जागृत व नवीन --- उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. सकाळी कॉलेजच्या एकूण ९०० विद्यार्थ्यांना प्रा. महेंद्र चव्हाण यांनी सहजयोगाची माहिती व आत्मसाक्षात्कार दिप. संध्याकाळी श्री माताजींच्या प्रतिमेची मोठी मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर यादव बाबा मंदीरासमोर स्थानिक ३०० गावकऱ्यांना जागृती दिली. त्या कार्यक्रमास श्री अण्णा हजारे उपस्थित होते तो अत्यंत प्रभावित झाले. दुसऱ्या दिवशी फॉलोअप झाला. सोबत श्री. अण्णा हजारे यांनी सहजयोगाबद्दल वर्तमानपत्रात -- विचार दिले आहेत.

**गांवकरी** : बुधवार, दिनांक १ ऑगस्ट २००१

## 'सहजयोग' भरकटलेल्या जिवाला आधार : हजारे

टंबरी-बाळापूर (वार्ताहर):- जन्मापासून मृत्युपर्यंत माणूस सारखी धावपळ करतो ही धावपळ कशासाठी तर त्याला आनंद आणि समाधान पाहिजे. ते कशातच न मिळाल्यामुळे माणसाचे जीवनच भरकटले आहे. या भरकटलेल्या जीवाला आधार मिळावा म्हणून सहजयोग करा, असा संदेश समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिला.

अहमदनगर जिल्हा सहजयोग मंडळाव्यावतीने आदर्श गांव राळेगण सिद्धी येथे सहजयोग ध्यान केंद्राचे उद्घाटन व सामुहिक कुंडलिनी जागृतीच्या कार्यक्रमाप्रसंगी आत्मसाक्षात्कार घेतल्यानंतर त्यांनी आपुले मनोगत व्यक्त केले.

आण्णा हजारे पुढे म्हणाले की, माणसाला गाडीत किंवा माडीत आनंद वाटत नाही. कारण मनुष्य आनंद बाहेर शोधीत आहे. त्याचा खरा आनंद हा आत आहे. आणि सहजयोग ध्यान धारणेतून तो त्याला नक्की मिळेल. बाहेरील आनंद हा क्षणिक असतो तर आतील आनंद हा अखंड आणि स्थायी असतो.

राहुरीचे संशोधक प्राध्यापक महेंद्र चव्हाण यांनी यावेळी सहजयोगाविषयी अतिशय विस्तृत माहिती देऊन सर्व उपस्थितांना प.पू. श्री माताजींच्या कृपेत आत्मसाक्षात्काराची अनुभती मिळवून दिली. सहजयोगाच्या फायद्याविषयी बोलतांना प्रा. महेंद्र चव्हाण म्हणाले, सहजयोग ध्यान धारणेने रक्ताच्या कर्क रोगासारखे आजारही बरे होऊ शकतात माणसाची व्यसनापासून आपोआप मुक्ती होते. चैतन्य लहरी पेर पिकांना दिल्या तर उत्पन्नात भरमसाठ वाढ होते. तसेच अशा पिकांवर रोग सहसा येत नाहीत. विद्यार्थ्यांच्या स्मरण शक्तित वाढ होऊन अभ्यासात प्रगती होते. स्त्रियांमध्ये गृहलक्ष्मी तत्व जागृत होते. सहजयोगांचे ज्ञान हे शब्दांच्या पलिकडील ज्ञान असून आत्मबोध मिळवून देणारा सहायोग आहे. यात मनुष्य सदैव परमेश्वरी शक्तीशी जोडलेला असतो म्हणून तो परमेश्वराचा खरा भक्त होतो. कारण 'जो प्रळभरही नाही विभक्त तोच खरा भक्त 'असे त्यांनी शेवटी सांगितले.

प्रारंभी प. पू. माताजीश्री निर्मला देवीच्या चैतन्य प्रतिमेची गावातून ढोल-ताशयांसह मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर यादव बाबा मंदिरासमोर सभा झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गुलाबराव जोंधळे यांनी केले व समारोप डॉ. अशोक शिंदे यांनी केला. याप्रसंगी राळेगणचे माजी सरपंच गणपतराव औटी, सरपंच विलासराव पोटे तसेच स्थानिक ग्रामस्था बरोबरच संगमनेर , श्रीरामपूर, लोणी , आश्वी व अहमदनगर येथील सहजयोगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाकचौरे साहेब, वाकचौरे सर, रहाणे, आगरकर , फलटणकर , खंडागळे यांनी परिश्रम घेतले.

## पुणे सहजयोग केंद्र पब्लिक प्रोग्राम

मागील अंकात पुणे केंद्रातर्फे जोमाने सुरू केलेल्या पब्लिक प्रोग्राम्सच्या कार्याची माहिती दिली आहेच. या कार्याची गति दिवसेन दिवस वाढत आहे व सहजयोगी बंधू-भगिनी उत्साहाने त्यात भाग घेत आहेत. गेल्या महिन्या-दीड महिन्यात झालेले काही कार्यक्रम


| अ. क्र. | वार/दिवस | ..../फॉलोअप | वेळ | |
|---|---|---|---|---|
| १) | गुरूवार/९-८-२००१ | प्रतिकनगर कोथरूड, पुणे | सं. ६.०० | |
| २) | रविवार/१२-८-२००१ | कै. वसंतराव वैद्य विद्यालय राजेंद्रनगर, पुणे | सं. ५.०० | आता तेथे नविन सेंटर सुरू झाला आहे |
| ३) | सोमवार/१३-८-२००१ | हिंगणे | दिवसभर | |
| ४) | १५ ऑगस्ट २००१ | विद्याकुंज विद्यालय, वारजे | स. १२ ते रात्री ८ | |
| ५) | रविवार/१८-८-२००१ | पुणे-पिंपळे-निखल | स. ९ ते सं ६ | नविन सेंटर सुरू झाले आहे. |
| ६) | गुरूवार/२३-८-२००१ | गणेश चेंबर्स, उर्मिला सोसायटी धनकवडी, पुणे | रात्री ७ वा. | |
| (७) | शुक्रवार/२४-८-२००१ | राऊत बाग सोसायटी, धनकवडी | स. ६ ते ९ | |
| ८) | सोमवार/२५-८-२००१ | गणेशनगर मंडळ, धनकवडी | रात्री ९ | |
| ९) | रविवार/२६-८-२००१ | आनंदनगर, कोथरूड, पुणे | सं. ७.३० | |
| १०) | सोमवार/२७-८-२००१ | न्यू फ्रेन्ड्स कॉलनी, पौड रोड पुणे. | सं. ७.०० | |
| ११) | मंगळवार/२८-८-२००१ | धनलक्ष्मी पार्क, कोथरूड बस डेपोजवळ, पुणे. | सं. ७.३० | |
| १२) | ३१-८-२००१ | सिद्धीविनायक गणेश मंडळ पद्मावती, पुणे. | सं. ७.३० | |
| १३) | ३०-८-२००१ | शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बॅटमिंगटन हॉल, शिवाजीनगर, पुणे. | सं. ४ ते ७ | |
| १४) | शुक्रवार/ ७-९-२००१ | दत्तनगर, आंबेगाव, कात्रज, पुणे | सं. ७ वा. | |
| १५) | २५-८-२००१ | कानकास्ट प्रा. लि., चिंचवड, पुणे | दु. १ वा. | |
| १६) | गुरूवार/२०-९-२००१ | सुभाषनगर, महादेव मंदिर, पुणे | सं. ५ ते ७ | |

टीप : प. पू. श्रीमाताजींच्या कृपेत या कार्याचा प्रभाव पडून साप्ताहिक सामूहिक नवीन-नवीन उपकेंद्रेही सुरू होत आहेत व आता पुणे शहरातील व परिसरातील उपकेंद्रांची संख्या सत्तेचाळीस (४७) झाली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | १४-८२००१ | हपूस बाग, जुन्नर<br>हिरवे बुद्रुक, जुन्नर | संध्याकाळी<br>६ वा. | सेंटर. प्रस्तावित. |
| २) | ९-९-२००१<br>१६-९-२००१ | पाटस साखर कारखाना<br>ता. दौंड, जि. पुणे | सं. ६ वा | सेंटर सुरू झाले आहे. |
| ३) | मंगळवार/२५-९-२००१ | नारायणदास-रामदास हायस्कूल, इंदापूर, जि. पुणे | सं. ५.३० | |
| ४) | १९-८-२००१ | जुन्नर सेंटर<br>हाळदीकुंकु व जागृती कार्यक्रम | संध्याकाळी | |
| ५) | रविवार/३०-९-२००१ | अंबवणे, ता. भोर | संध्याकाळी ६ ते ९ | नवीन सेंटर प्रस्तावित |


सहजयोग







# महाराष्ट्र सहजयोग सेमिनार, इचलकरंजी दि. ७-८-९ सप्टेंबर, २००१

















